## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२१४

निर्णय दिनांक ०२-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. नंदलाल बन्सीलाल दरक,<br>रा. शिरेगाव, तालुका गंगापूर,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग,<br>मराविविकंम, औरंगाबाद | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग,<br>मराविविकंम, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. नंदलाल बन्सीलाल दरक (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, मराविविकंम, औरंगाबाद श्री. व्हि. के. देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,

ग्रामीण विभाग, मराविविकंम, औरंगाबाद श्री. पांडव एस. व्ही. (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १५-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

“ सिल्लेगाव बृहत लघुपाटबंधारे प्रकल्प तालुका गंगापूर अंतर्गत मौजे शिरेगाव व देवणी पुनर्वसन नागरी सुविधा आणि विज पुरवठा संबंधात ही माहिती आहे. सदर माहितीचा कालावधी १९९७ ते ३०-१०-२००६ पर्यंत असा दर्शविला आहे.

१. शिरेगाव व देवणी पुनर्वसनाच्या बाबतची १९९७ ते २००६ पर्यंत विज पुरवठ्याची संक्षिप्त टिपणी.

२. मौजे शिरेगाव, देवणी साठी स्ट्रीट लाईट (ट्युब लाईट) बाबतची सर्व संचिका टिपणसह

३. शिरेगाव गावठाणात स्वतंत्ररित्या सिंगल फेजींग सुरु करण्याबाबतचा अहवाल.

अपीलार्थीने सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

अपीलार्थीने ज्या ३ मुद्यांची माहिती मागविली आहे त्याचे अवलोकन करता अपीलार्थीस मुद्दा क्रमांक १ व ३ बाबत नेमके काय म्हणावयाचे आहे त्याचा स्पष्ट बोध होत नाही.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-११-२००६ च्या पत्रान्वये प्रथम माहिती दिली. सदर पत्र अपीलार्थीने दिनांक २९-११-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतल्याचे दिसून येते.

जन माहिती अधिकारी यांनी वरील प्रमाणे दिलेल्या माहितीवर अपीलार्थीचे समाधान न झाल्यामुळे अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००७ चे कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केलेले आहे.

या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यांचे आदेश दिनांक २४-०१-२००७ रोजी पारीत केले आहे. सदर सुनावणीस अपीलार्थी गैरहजर होते व या सुनावणी मध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने विचारलेली माहिती पुर्णपणे देण्याचे कबूल केल्याने जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीचे अपील रद्द केले व अपीलार्थीस माहिती हवी असल्यास जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी करण्यास सुचित केले. जन अपीलीय अधिकारी यांनी या अपीलावर दिलेला निर्णय म्हणजे अपील कसे ठरवू नये याचा उत्तम नमुना असे म्हटल्यास वावगे ठरु नये. वास्तविक त्यांनी या प्रकरणी अपीलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती पुरविण्यासंदर्भात निश्चित स्वरुपाचे आदेश पारीत करणे आवश्यक होते तथापि त्यांनी तसे आदेश पारीत केल्याचे अपील आदेशामध्ये दिसून येत नाही.

जन अपीलीय अधिकारी यांच्या वरील अपील आदेशामुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे आढळून आले आहे की, अपीलार्थीने मुळी माहिती मागतांनाच संदिग्ध स्वरुपाची माहिती मागितली आहे. यातील मुद्दा क्रमांक २ शिरेगाव व देवणी या गावासाठी स्ट्रीट लाईट विद्युतीकरण बाबत कंपनीच्या अधिका-यांनी केलेले अंदाजपत्रक, नकाशे, प्रत्यक्ष केलेली कामे, कामाकरिता आलेला खर्च, जलसंपदा विभागाकडून त्यांना प्राप्त झालेले अनुदान व उर्वरीत काही काम उरलेले असल्यास त्याचा तपशील ही माहिती अपीलार्थीस हवी असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीमध्ये सांगितले तर ही माहिती ३ दिवसात देण्याचे म.रा.वि.वि.कं.स. च्या अधिका-यांनी कबूल केले तेव्हा असे आदेशित

करण्यात येते की, अपीलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित झाल्या पासून ३ दिवसाच्या आत ही माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी शिरेगाव व देवणी या गावासाठी स्ट्रीट लाईट विद्युती करण बाबत कंपनीच्या अधिका-यांनी केलेले अंदाजपत्रक, नकाशे, प्रत्यक्ष केलेली कामे, कामाकरिता आलेला खर्च, जलसंपदा विभागाकडून त्यांना प्राप्त झालेले अनुदान व उर्वरीत काही काम उरलेले असल्यास त्याचा तपशील ही माहिती अपीलार्थी यांना हे आदेश निर्गमित झाल्यापासून ३ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नंदलाल बन्सीलाल दरक, रा. शिरेगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, मराविविकंम, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण विभाग, मराविविकंम, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३४०

निर्णय दिनांक ०२-०७-२००७

श्री. मधुकर बाबाराव कुलकर्णी, : अपीलार्थी
गोदावरीदेवी कन्या शाळेजवळ, लातूर,
तालुका जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था
लातूर तालुका जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था
लातूर तालुका जिल्हा लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०२-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. मधुकर बाबाराव कुलकर्णी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था लातूर तालुका जिल्हा लातूर श्री. राजेश कालीदास लव्हेकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था

लातूर तालुका जिल्हा लातूर श्री. भानुदास त्रिंबक बधान (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक १४-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहितीची मागणी केली होती.

१) "जा. क्र. १२०६/औद्योकि स्नेहप्रभागृसं/निवडणूक/०६ कार्यालय विभागीय सह निबंधक सह. संस्था लातूर दिनांक ०५-०९-२००६ प्रगती अहवाल व कृती अहवाल.

२) जा. क्र. १२९७/दक्षता कक्ष/श्री.लव्हेकर/कोथळीकर/चौकशी/०६ कार्यालय विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर दिनांक १४-०९-२००६ प्रगती अहवाल व कृती अहवाल."

सदरील माहिती अपीलार्थी यांनी साध्या टपालाव्दारे पोस्टाचा दाखला घेऊन मागितली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांना त्यांचे कडील दिनांक ०६ डिसेंबर २००६ च्या पत्राव्दारे उत्तर दिले. या उत्तरामध्ये अपीलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्याऐवजी त्यांनी अपीलार्थीस त्यांचे कार्यालयात संबंधित संचिका च्या तपासणीसाठी अर्ज करण्याचे सुचित केले व तपासणीच्या वेळेस त्यांना ज्या ज्या रेकॉर्डची प्रत हवी आहे ती उपलब्ध करुन देण्यात येईल असे आश्वासीत केले.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये दिनांक १५-१२-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

जन अपीलीय अधिकारी यांनी या प्रकरणी दिनांक १९-११-२००६ रोजी प्रथम सुनावणी घेऊन दिनांक १०-०१-२००७ रोजी आपला या संदर्भातील निर्णय पारीत केला.

या निर्णयामध्ये त्यांनी अपीलार्थीचे अपील मान्य करुन, जन माहिती अधिका-यास अपीलार्थी यांनी त्यांचे अर्जामध्ये मागणी केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे त्यांना सुचित केले व त्याच बरोबर अपीलार्थी यांच्याकडून संबंधित शुल्क भरणा करुन घेण्याच्या सूचना दिल्या. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १२-०१-२००७ रोजी पत्र लिहिले. या पत्रामध्ये अपीलार्थीस परत दप्तर पाहण्यासाठी अर्ज करण्याचे सुचित केले व दप्तर पाहणीमध्ये त्यांना जी कागदपत्रे हवी आहेत ती कागदपत्रे पुरविण्याची तयारी दर्शविली.तथापि त्यानंतर अपीलार्थी ही माहिती पाहण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात आले नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे अपील करुनही माहिती न मिळाल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०२-२००७ रोजी व्दितीय अपील दाखल केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन असे आढळून आले आहे की अपीलार्थी हे एकाच विषयावर वेगवेगळ्या प्राधिकरणाकडे या कागदपत्राची मागणी करत असतात. प्रत्येक वेळी त्यांनी मागणी केलेल्या पत्राचा संदर्भ व दिनांक बदललेला दिसतो. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या तर्फे असा युक्तीवाद मांडला की संबंधित अपीलार्थी यांनी ही मागणी त्यांच्याकडे नंतर केली असून प्रत्येक वेळी त्यांच्या मागणीचे स्वरुप व संदर्भ क्रमांक बदललेला असतो तेव्हा त्यांना निश्चित व सत्य माहिती प्राप्त करन देण्याच्या दृष्टीने त्यांनी अपीलार्थीस त्यांच्या कार्यालयात बोलाविले होते तथापि अपीलार्थी त्यांच्या कार्यालयात हजर झाले नाहीत. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपीलार्थीने प्रथम केलेल्या अर्जातील संदर्भ व नंतर जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे केलेले संदर्भ हे सर्व भिन्न असल्याचे दिसते, अपीलार्थीस नेमकी कोणती कागदपत्रे

हवी आहेत याचा बोध आज सुनावणीमध्ये होऊ शकला नाही. उपलब्ध कागदपत्रे व उपस्थित अधिकारी यांचे म्हणणे ऐकले असता या प्रकरणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयात आज रोजी बदल करण्याची आवश्यकता वाटत नाही त्यांचा निर्णय कायम ठेवण्यात येऊन अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी यांना पुढे असे आदेशित करण्यात येते की अपीलार्थी यांनी त्यांच्याकडे याविषया संदर्भात ज्या कागद पत्रांची मागणी त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे केली आहे ती कागदपत्रे त्यांना हे आदेश पारीत झाल्या पासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. तसेच त्यांनी या प्रकरणात अपिलार्थीस माहिती न पुरविता वारंवार त्यांच्या कार्यालयात हजर राहण्याच्या सूचना देण्याची त्यांची कृती या प्रकरणी गैरलागू ठरते. त्यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेळेत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०२ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर बाबाराव कुलकर्णी, गोदावरीदेवी कन्या शाळेजवळ, लातूर, तालुका जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था लातूर तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभागीय सह निबंधक सहकारी संस्था लातूर तालुका जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०७

निर्णय दिनांक ०३-०७-२००७

श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार, : अपीलार्थी
पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना
रोड, बीड तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा व्यवस्थापक वडवणी तालुका खरेदी विक्री
संघ, म. वडवणी, तालुका वडवणी जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था बीड

तालुका जिल्हा बीड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक वडवणी तालुका खरेदी विक्री संघ, म. वडवणी, तालुका वडवणी जिल्हा बीड श्री. राम भाऊसाहेब बढे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), त्यांचे वकील कुलदीप आत्माराम टेंगसे व जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था बीड तालुका जिल्हा बीड श्री. आप्पाराव लिंबाजी घोलकर (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे कडील दिनांक ३०-१०-२००६ च्या पत्रान्वये वडवणी तालुका खरेदी विक्री संघाची संचालक मंडळाची यादी नाव व पत्त्यासह द्यावी, संघाच्या नोंदणीपासून आजच्या दिनांकापर्यतच्या ऑडिट रिपोर्टच्या सर्व प्रती, संघाच्या सर्व कर्मचा-यांची यादी नाव व पदासह, संघाच्या सभासदाने जमा केलेली सभासद वर्गणी, भाग भांडवल पत्ता, संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभांच्या मागील २ वर्षाच्या प्रती, संघाकडे सहकारी बॅकेचे अथवा शासनाचे कर्ज असल्यास किती कर्ज बाकी आहे व कोणत्या कारणासाठी ते घेतले होते. संघाच्या स्थापनेच्या वेळेचा व आजचा संघाचा स्थावर व जंगम मालमत्तेचा तपशील व खरेदी विक्री संघामार्फत कोणकोणते व्यवहार चालतात याबद्दल ची माहिती मागविली होती.

अपीलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदरचा अर्ज अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठविला होता तथापि सदर रजिस्टर्ड पाकिट अपीलार्थीस दिनांक ०७-११-२००६ रोजी सदर ऑफिस बंद असल्याचा शेरा लिहून पोस्टमनने अपीलार्थीस परत केले. यावरुन जन माहिती अधिकारी यांचे कार्यालय बंद असल्याचे समजून अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) नुसार जन अपीलीय अधिकारी यांच्या कडे दिनांक २१-११-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

या अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०२-०१-२००७ रोजी ठेऊन आपला निर्णय पारीत केला. त्यामध्ये अपीलार्थी यांचे अपील अर्ज फेटाळून त्यांना प्रतिवादीकडे परत अर्ज करुन नियमाप्रमाणे फीस भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी व त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती देण्याची कारवाई तात्काळ सुरु करण्याची सूचना दिली.

जन अपीलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणतेही अपील न करता अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्यामुळे त्यांना प्रतिदिन रुपये २५० याप्रमाणे शास्ती लावण्यात यावी व अपीलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे अशी विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादाच्या वेळी अपीलार्थी हे हजर नव्हते. जन अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली कागदपत्रे पाहता अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत डाकेने पाठविलेले पाकिट अपीलार्थीस परत आल्याचे, सदर पाकिटाच्या

झेरॉक्स प्रतीवरुन दिसून येते. या पाकिटात नक्की अर्ज होता का याबाबत काहीही पुरावा आजमितीस उपलब्ध नाही. आज सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे शपथपत्राव्दारे सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांचे कार्यालय सुट्टीचे दिवस वगळता कार्यालयीन वेळेत उघडे व कार्यरत असते. या कार्यालय ३ इतर कर्मचारी काम करत असून दिवसभरात सभासदांची व पदाधिका-यांची कार्यालयात ये जा चालू असते त्यामुळे कार्यालय बंद असण्याचे काही कारण नाही. सदर कार्यालय बंद असल्या बाबतचा एक शेरा केवळ संबंधित पोस्टमनने लिहिला आहे. त्यांनी या शपथपत्रामध्ये सदरहू पोस्टमन जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये कामकाजाच्या वेळी आले नव्हते त्यांनी जन माहिती अधिका-याच्या परस्पर त्या पाकिटावर शेरा लिहून सदरचे पाकिट अपीलार्थीस परत केले आहे. त्याच बरोबर अपीलार्थीने त्यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीची मागणी रितसर केल्यास ते अपीलार्थीस सदर माहिती देण्यासाठी तयार असल्याचे त्यांनी कबूल केले.

उपरोक्त परिस्थितीत जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेले शपथपत्र व जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी केलेला युक्तीवाद यावरुन जन अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. आता असे आदेशित करण्यात येते की, जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे अपीलार्थी ने सादर केलेल्या प्रथम अर्जाची प्रत संबंधित संस्थेचे जन माहिती अधिकारी यांना द्यावी तद नंतर संबंधित सहकारी संस्थेच्या जन माहिती अधिका-याने ही माहिती अपीलार्थीस देण्यापोटी लागणारे शुल्क अपीलार्थीस नोंदणीकृत डाकेने कळवावे व अपीलार्थीकडून सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर संबंधित संस्थेने अपीलार्थीस लागलीच आवश्यक ती माहिती पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रेमचंद गुलाबचंद नहार,पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, जालना रोड, बीड तालुका जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक वडवणी तालुका खरेदी विक्री संघ, म. वडवणी, तालुका वडवणी जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था बीड तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २०८/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०३-०७-२००७.

१. श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार .. अपिलार्थी.
पंकज मोटार्स,स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालनारोड बीड,
तालूका जिल्हा-बीड ४३११२२.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,
माजलगाव, जिल्हा-बीड.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,बीड.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ) गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माजलगांव,जिल्हा- बीड. श्री.वसंत विष्णु घुले, ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, श्री.अप्पाराव लिंबाजी घोलकर, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- ३०-१०-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचे कार्यक्षेत्रातील वडवणी तालुक्यातील तेलबिया व फळ प्रक्रिया या सहकारी संस्थे बद्दलची माहिती मागविली होती.

“ १) या संस्थांच्या सभासदांच्या प्रमाणित याद्या द्याव्यात.

२) या संस्थाच्या पोटनियमांच्या प्रमाणित प्रती द्याव्यात.

३) या संस्थानी कोणकोणत्या सहकारी बँका व शासनाकडून कर्ज व अनुदान घेतलेले आहे या बद्दलची माहिती द्यावी. सदर कर्ज केव्हां म्हणजे कोणत्या तारखेला घेतलेले आहे व त्यानंतर कर्जाची परतफेड झालेली आहे किंवा नाही. तसेच त्याचा काय विनीयोग केलेला आहे, याची प्रमाणीत माहिती द्यावी.

४) या संस्थांनी संस्थेच्या नोंदणीपासून आजपर्यंत आपणाकडे दाखल केलेल्या ऑडिट रिपोर्टच्या प्रती द्याव्यात.

५) या संस्थांनी ऑडिट रिपोर्टच्या प्रती आपणाकडे दाखल केलेल्या नसतील तर आपण त्यांचेवर काय कार्यवाही केली. त्या कार्यवाहीची / आदेशांच्या प्रमाणित प्रती द्याव्यात.

६) नियमाप्रमाणे प्रत्येक संस्थांनी प्रत्येक वर्षी ऑडिट रिपोर्ट दाखल करणे आवश्यक आहे. तथापी, जर या संस्थांनी ऑडिट रिपोर्ट दाखल केलेला नसेल तर आपण कोणत्या नियमान्वये त्यांचेवर कार्यवाही करणार आहात या बद्दलची माहिती द्यावी.”

अपिलार्थीने ही माहिती टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीने अपेक्षित माहितीच्या संबंधीत कालावधी म्हणून संस्थेच्या नोंदणी पासून ते आजपर्यंत असा दर्शविला आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २८-११-२००६ रोजी अपिलार्थीस ही माहिती पुरविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता जनमाहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक-१ व सदर संस्थेने घेतलेल्या कर्जा संदर्भात व काही लेखापरिक्षणाच्या अहवालाच्या मुद्यांची या माहितीमध्ये समावेश नाही. या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस संबंधीत संस्था, संबंधीत बँकेचे जनमाहिती अधिकारी व विशेष लेखापरिक्षक वर्ग-१ ,बीड यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचीत केले. थोडक्यात जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस दिली व जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती त्या संदर्भात संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचीत केले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०४-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती केली आहे.

अपिलार्थी यांच्या या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून दिनांक- ११-०१-२००७ रोजी आदेश पारीत करुन त्यामध्ये अपिलार्थी यांचे अपील अंशतः मान्य केले व त्याचबरोबर जनमाहिती अधिकारी तथा व्यवस्थापक दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.बीड यांनी अपिलार्थीकडून

नियमाप्रमाणे फीस जमा करुन घेवून आवश्यक ती माहिती अपिलार्थीस  देण्याचे सूचीत केले. तथापि जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली आहे. बॅकेने संबंधीत संस्थेशी केलेल्या कर्जव्यवहारा बद्दल ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देवू शकले नाहीत. तथापि त्यांनी  ती माहिती देण्यापोटी  जिल्हामध्यवर्ती सहकारी बॅक बीड यांच्याकडून  माहिती प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यांनी  बॅकेकडून माहिती मागविली असता, संबंधीत बॅकेने जनमाहिती अधिका-यास कोणतीही माहिती न देता अपिलार्थीने बॅकेकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदीनूसार माहिती साठीचा वेगळा अर्ज केल्यानंतर त्यांना ती माहिती पुरविण्यात येईल, असे जनमाहिती अधिका-यास दिनांक- ०९-११-२००६ रोजीच्या पत्रान्वये कळविले. जनमाहिती अधिकारी  जिल्हामध्यवर्ती बॅक बीड यांची ही कृती पूर्णतः चुकीची असून त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधकय सहकारी संस्था, बीड यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर तात्काळ कार्यवाही करुन सहनिबंधक सहकारी संस्था बीड यांना अपिलार्थीने मागितलेली माहिती, पुरवावयास हवी होती. तथापि त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. याचाच दुसरा अर्थ  त्यांनी ही माहिती अपिलार्थीस देण्याची टाळाटाळ केली, असे काढल्यास फारसे वावगे होणार नाही, असे आयोगाचे मत आहे.

अपिलार्थीने मागितलेली माहिती ही बीड जिल्हयातील आदर्श सहकारी दालमील व कृषी प्रक्रिया संस्था, म. वडवणी व शेतकरी सहकारी तेलबिया कृषी प्रक्रिया संस्था, म. वडवणी हया दोन संस्थेशी संबंधीत आहे. या दोन्हीही संस्थेवर सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, बीड यांचे पूर्णपणे नियंत्रण असल्याचे आज झालेल्या युक्तीवादामध्ये आढळून आले. सदर संस्थेवर सर्वसाधारण नियंत्रण ठेवणे, त्यांची तपासणी करणे, लेखापरीक्षण करणे व त्यांनी मागणी केल्यास निवडणूक घेणे व त्याचबरोबर मुदत संपल्यानंतर या संस्थेवर शासनाचे प्रशासक नेमणे इत्यादी प्रकारचे शासनाचे नियंत्रण या संस्थेवर आहे. म्हणजेच माहिती अधिकार अधिनियम २००५ हा या संस्थांना लागू आहे. वास्तविकतः अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी या संस्थाकडून व बॅकेकडून प्राप्त करुन घेवून नंतर ती अपिलार्थीस पुरविणे, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतूदी प्रमाणे अपेक्षित आहे. तथापि त्यांनी स्वतः माहिती गोळा न करता अपिलार्थीस संबंधीत संस्थेकडे व बॅकेकडे माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता सूचीत केले. त्यांची ही कृती चुकीची आहे.

सहकार खात्याच्या अधिका-यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन व अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपीलाची तपासणी करता असे आदेशीत करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस अद्यापही जी माहिती द्यावयाची आहे ती संपूर्णपणे अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून आठ दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी. अपिलार्थीस ही माहिती

देण्या संदर्भात  व्यवस्थापक, दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.बीड व उपरोक्त दोन्हीही संस्थेचे अध्यक्ष यांनी सर्वोतोपरी सहकार्य करावे.

या प्रकरणी एका बाबीचा उल्लेख करणे आवश्यक ठरते ती बाब म्हणजे जिल्हा सहकारी बँकेच्या व्यवस्थापकाने अपिलार्थीस माहिती दिली नाही. मात्र त्यांनी कायद्यातील पळवाटा शोधून त्यांनी ही माहिती देण्याचे टाळाटाळ केल्याचे दिसते. अपिलार्थीस माहिती देण्यामध्ये अशा केलेल्या टाळाटाळी बद्दल आयोगातर्फे त्यांना सक्त ताकीद देण्यात येत आहे व  येथून पुढे अशा प्रकरणी त्यांच्याकडे माहितीची विचारणा जनमाहितती अधिकारी यांच्याकडून झाल्यास त्यांनी ती तात्काळ पुरवावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचीत करण्यात येत आहे. वरील विवेंचनासह अपिलार्थीचे हे अपील निकाली काढण्यात येत आहे व खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल  अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीने त्यांच्या मूळमाहितीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक वाटल्यास, वेगवेगळया शासकीय प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेवून ती एकत्र माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून आठ दिवसाच्या आत अपिलार्थीस विनामुल्य पुरवावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमीत झाल्यापासून २१ दिवसाच्या आत पाठवावा.

औरंगाबाद                                                    **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०३-०७-२००७                                   **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, स्टेडियम कॉम्प्लेक्स, बीड

२ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,माजलगाव, जिल्हा-बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ शासकीय माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, व्यवस्थापन/ बँकीग,
दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.बीड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ चेअरमन, आदर्श सहकारी दालमिल व कृषी प्रक्रिया संस्था म.वडवणी आणि शेतकरी तेलबिया व कृषी प्रक्रिया संस्था म. वडवणी जिल्हा- बीड.

६ श्री. दौड, सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

७ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २१८/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०३-०७-२००७.

१. श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार .. अपिलार्थी.
पंकज मोटार्स,स्टेडियम कॉम्प्लेक्स,
जालनारोड बीड,
तालूका जिल्हा-बीड ४३११२२.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
सहाय्यक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित उपविभागीय कार्यालय,
तेलगांव तालूका- वडवणी,जिल्हा-बीड.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित विभागीय कार्यालय, अनिकेत
बिल्डींग, ज्ञानेश्वरनगर,
अंबाजोगाई. जिल्हा-बीड.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ) गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित उपविभागीय कार्यालय, तेलगाव ता. वडवणी, जिल्हा-बीड, श्री.किशोर यादव देशपांडे, ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, मर्यादित विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जिल्हा- बीड, श्री. के.बी.फकीर, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- ०४-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,

मर्यादित,तेलगाव, ता. वडवणी, यांच्याकडे  शेतकरी सहकारी जिनींग व प्रेसींग संस्था म.वडवणी या संस्थेच्या संदर्भात सन १९८९ ते अर्ज करण्याच्या दिनांकापर्यंतची खालील नऊ मुद्यावर माहिती मागविली होती.

“ १) या संस्थेला प्रथम विद्युत पुरवठा कधी दिला. याची माहिती संस्थेने विद्युत पुरवठयाची मागणी केलेल्या अर्ज व ठरावाच्या प्रतीसह द्यावी.

७) विद्युत पुरवठयाबाबत आपल्या कार्यालयाने केलेल्या पाहणी अहवालाची प्रत द्यावी.

८) या संस्थेस प्रथमतः दिलेले विद्युत कलेक्शन आज चालू आहे किंवा कसे या बदलची माहिती द्यावी. जर आपणामार्फत सदरील संस्थेचा विद्युत पुरवठा खंडीत करुन पुन्हा वीज पुरवठा दिलेला असेल तर वीज पुरवठा मागणीसाठी पुन्हा केलेल्या अर्जाची आपल्या कार्यालयाच्या टिपणीसह व पाहणी अहवालासह प्रत द्यावी.

९) संस्थेस प्रत्येक वर्षासाठी किती रुपयांचा वीज पुरवठा केला व संस्थेने प्रत्येक वर्षी किती वीज बील भरले याची माहिती द्यावी. हे वीज बील कोणकोणत्या तारखेला भरले याची माहिती वर्षनिहाय द्यावी.

१०) संस्थेकडे आज रोजी किती थकबाकी आहे व ती वसूल करण्यासाठी आपण काय कार्यवाही केलेली आहे त्या कार्यवाहीच्या आदेशाच्या प्रती द्याव्यात. म्हणजेच वसूलीसाठी प्रथम पासून आजपर्यंत बिलाव्यतिरिक्त कोणकोणता पत्रव्यवहार केला त्यांच्या प्रती द्याव्यात.

११) विद्युत पुरवठा खंडीत करुन तो त्याच जागी पुन्हा नव्याने अर्ज घेवून जोडून दिलेला असेल तर असे करताना घेतलेले नाहरकत

प्रमाणपत्र, पाहणी अहवाल व सदरील संचिकेवरील आपल्या कार्यालयाची टिपणी इत्यादीची प्रत द्यावी.

१२) थकबाकी असतांना वरील प्रमाणे विद्युत पुरवठा जर जोडून पुन्हा नव्याने वीज पुरवठा केलेला असेल तर त्यासाठी कोणते नियम/ शासन आदेश आहेत. त्याची प्रत द्यावी.

१३) या संस्थेला आपण विद्युत पुरवठा केला होता. त्यानंतर सदरील संस्थेचा लिलाव झाल्याचे समजले/ झालेला आहे. आपली या संस्थेकडे असलेली थकबाकी लिलावापूर्वी वसूल झाली होती काय? त्याची माहिती द्यावी.

१४) लिलावानंतर पुन्हा वीज पुरवठा दिलेला आहे किंवा नाही याची माहिती द्यावी. आज रोजी सदरील संस्थेकडे किती वीज बील बाकी आहे व सद्यस्थितीत संस्थेचे चालक कोण आहेत त्यांची नावे व पत्यासह माहिती द्यावी."

सदर मागणी अपिलार्थीने टपालाव्दारे अपेक्षिली होती.

सदर माहिती कनिष्ठ अभियंता यांच्याकडे मागितली होती. तथापि सदर कनिष्ठ अभियंता यांनी हे माहिती अधिकारी नसल्याने, कनिष्ठ अभियंत्यांने त्यांचकडील पत्र दिनांक- ११-१२-२००६ अन्वये अपिलार्थीचा अर्ज त्यांना परत करुन जनमाहिती अधिकारी यांचा तपशील पुरविला. तद्नंतर संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने दिनांक- १८-१२-२००६ रोजी परत याच मुद्यावर माहिती मिळविण्यासाठी अर्ज केला. अपिलार्थीच्या या दिनांक- १८-१२-२००६

रोजीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक- २०-०१-२००७ रोजी माहिती पुरविलयाचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीवरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थस दिल्याचे आढळून येते. त्याचबरोबर जी कागदपत्रे उपलब्ध नाही त्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी सदर कागदपत्रे उपलब्ध नसल्यामूळे अपिलार्थीस देता येत नाहीत, असे कळविले आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या या माहितीवर अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. या अपील अर्जाची पहाणी करता, असे आढळून येते की, अपिलाथीने या अर्जावर दिनांक- १८-१२-२००६ अशी तारीख प्रथम टंकलिखित केली आहे परंतू तद्नंतर ही तारीख खोडून त्यावर दिनांक- ०३-०१-२००७ अशी तारीख टाकलेली दिसून येते. या खाडाखोडीवर कोणाचीही स्वाक्षरी नसल्यामूळे ही खाडाखोड नेमकी कोणी केली, हे कळण्यास मार्ग नाही. याचा अर्थ अपिलार्थीस प्रथम माहिती मिळण्यापूर्वीच अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील देण्याची तयारी केली होती. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळण्यापूर्वीच जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे करावयाचे अपील तयार करुन ठेवणे ही अपिलार्थी यांची कृती या अपिलाच्या विश्वासर्हतेला छेद देत आहे,. यात शंका नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने सदर अपील कार्यकारी अभियंता, अंबाजोगाई जे या प्रकरणात जनअपिलीय अधिकारी आहेत, त्यांच्याकडे न

करता कार्यकारी अभियंता, बीड यांच्याकडे म्हणजे, चुकीच्या प्राधिकरणाकडे केल्याचे आढळून येत आहे.

अपिलार्थीच्या सदर अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २५-०१-२००७ रोजी सुनावणी घेवून त्याच दिवशी आपला निर्णय पारीत केला. सदर निर्णया मध्ये त्यांनी अपिलार्थीने त्यांच्याकडे केलेले अपील फेटाळून लावले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १५-०१-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पूर्ण माहिती न दिल्यामूळे त्यांच्यावर या अपीलाचा निर्णय लागेपर्यंत प्रतिदिन २५० रुपये प्रमाणे शास्ती लावावी व त्यांच्यावर शिस्तभंगाची प्रस्तावित करण्याचे व अपिलार्थीस माहिती विनामुल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. अपिलार्थी यांनी त्यांना मुद्दा क्रमांक-१, मुद्दा क्रमांक-२ व मुद्दा क्रमांक-४, ७ व ८ ची माहिती पूर्णतः न देता अपूर्ण दिली असल्याचे म्हटले आहे. अपिलार्थीने उपस्थित केलेल्या या मुद्यापैकी मुद्दा क्रंमाक-१ व २ ची माहिती आजमितीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडे कोठेही उपलब्ध नाही, असे त्यांनी शपथपत्रावर सांगितले आहे. त्याचबरोबर मुद्दा क्रमांक-४ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रत्येक वर्षात, प्रत्येक महिन्याची विजेची थकबाकीच्या माहितीची मागणी केली आहे. तथापि महिनानिहाय ही माहिती विद्युत कंपनीकडे उपलब्ध नसल्यामूळे त्यांनी अर्ज केलेल्या दिनांकापर्यंत

एकूण थकबाकीची रक्कम अपिलार्थीस कळविली आहे. महिना निहाय सदर माहिती विद्युत कंपनीकडे आजमितीस उपलब्ध नाही.

अपिलार्थीने उपस्थित केलेला मुद्दा क्रमांक ७ च्या संदर्भात शासनाचे कोणते आदेश नसल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दिली नाही. त्याचबरोबर अपिलार्थीने सदर कंपनीकडे लिलावापूर्वी असलेली थकबाकी, लिलावापूर्वी वसूल झाली होती काय याची माहिती विचारली आहे व त्यास विद्युत कंपनीने सदर संस्थेचा लिलाव झाल्या बाबतची माहिती विद्युत कंपनीस माहित नाही व या कंपनीचे संस्थेकडे असलेली थकबाकीची वसूली झाली नाही, असे उत्तर दिले आहे. विद्युतकंपनीकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे विचारात घेता, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती आयोगास योग्य वाटते व त्यामध्ये अपिलार्थीस माहिती देण्यास हेतुतः टाळाटाळ केल्याचे आयोगाच्या दृष्टोत्पतीस आले नाही. अपिलार्थीने या अर्जामध्ये संबंधित कनिष्ठ अभियंता यांनी त्यांचा अर्ज विचारात न घेता परत पाठविला आहे. अशा अर्थाचे विधान केले आहे. अपिलार्थीच्या मते सदर अर्ज कनिष्ठ अभियंता यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी तो पाच दिवसाच्या आत संबंधित सहाय्यक अभियंता जे या प्रकरणातील जनमाहिती अधिकारी आहेत त्यांच्याकडे पाठवावयास हवा होता, असे म्हटले आहे व कनिष्ठ अभियंता यांनी ही दिरंगाई केवळ माहिती न देण्याच्या दृष्टीने केली होती, असे अपिलार्थी यांचे म्हणणे आहे. कनिष्ठ अभियंत्याने संबंधीत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे पाच दिवसाच्या आत हा अर्ज पाठवावयाचा होता, हे अपिलार्थीचे म्हणणे जरी खरे असले तरी त्यानी ही कृती जाणूनबूजून केल्याचे किंवा माहिती न देण्याच्या उद्देशाने केल्याचे आयोगास आढळून येत नाही. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर जनमाहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक

कार्यवाही करण्या इतपत त्यांच्याकडून दिरंगाई झाल्याचे किंवा माहिति देण्यासाठी टाळाटाळ झाल्याचे आयोगास आढळून येत नाही. त्यांच्याकडे आजमितीस जे रेकार्ड उपलब्ध आहे. त्या रेकार्डवरुन त्यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत संपूर्ण माहिती देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केल्याचे दिसून येते. सदर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यामूळे अपिलार्थीस देता आली नाही, असे त्यांनी आयोगास शपथपत्रावर कबुल केले, हे पहाता अपिलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०३-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.प्रेमचंद गुलाबचंद नहार, पंकज मोटार्स, स्टेडियम कॉम्प्लेक्स, बीड, जि.बीड.

२ जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित तेलगाव, तालूका- वडवणी, जिल्हा- बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित विभागीय कार्यालय, अंबाजोगाई जि. बीड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३३

निर्णय दिनांक ०३-०७-२००७

श्री. सुधाकर कारभारी शेजवळ, : अपीलार्थी
शिवाजीनगर, कन्नड, तालुका कन्नड
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा चेअरमन, महाराणा प्रताप मजूर सहकारी
संस्था (म) ब्राम्हण गल्ली, कन्नड
तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड

तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सुधाकर कारभारी शेजवळ कन्नड, जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, महाराणा प्रताप मजूर सहकारी संस्था (म) ब्राम्हण गल्ली, कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद व जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद हे सर्व गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ०६-१२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ०१-०१-२००५ ते ०५-१२-२००७ पर्यतच्या कालावधीतील त्यांच्या संस्थेकडून "१) मजूर संस्थेचे मजुरांचे फोटो, २) संस्थापक अध्यक्ष तथा चेअरमन यांचे फोटो, ३) मजूर संस्थेचे सर्व कागदपत्र ४) बॅकेचे पासबुक ५) मजूर संस्थेने केलेल्या कामाची यादी, ६) या संस्थेचे चेअरमन यांनी किती लाखांची कामे केली आहेत" ही मागविली होती. याच बरोबर अपिलार्थीने सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड यांचेकडे देखील दिनांक २८-११-२००६ रोजी असाच माहितीचा अर्ज केलेला दिसून येतो. त्यातील एक मुद्दा वर क्रमांक ६ म्हणून या अपिल सुनावणीमध्ये विचारात घेतला आहे.

सदर माहिती अपीलार्थीने शिघ्र टपालाव्दारे आणि व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून या अर्जावर कोणतीही कारवाई झाल्याचे आयोगास सादर केलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या ही प्रकारची माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-११-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

या अपीलावर जन अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०१-२००७ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीमध्ये जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थी यांचे अपील मान्य करुन जन माहिती अधिकारी महाराणा प्रताप मजूर सहकारी संस्था कन्नड यांना अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती देण्याचे सुचित केले.

जन अपीलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही अपीलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २३-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी, जन अपीलीय अधिकारी व अपीलार्थी हे तिघेही अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती देणे हे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७ अन्वये अपीलार्थीस ही माहिती देणे अनिवार्य आहे. या प्रकरणामध्ये सदर मजूर सहकारी संस्था शासनाच्या अनेकविध सवलतीचा, उदा. विना निविदा कामे मिळणे, निविदा सादर करतांना बयाणा रकम भरण्यापासून सुट असणे, चालू दरसुची नुसार कामे मिळणे इत्यादी प्रकारच्या अनेक सवलतीचा लाभ घेत असतात त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी या संस्थेस तंतोतंत लागू पडतात. मुळातच या संस्थेने जन माहिती अधिकारी तरी नियुक्त केला आहे किंवा कसे हे कळण्यास काही मार्ग नाही.

अपीलार्थीचा अर्ज व सदर मजूर सहकारी संस्थेने अपीलार्थीस दिलेला थंड प्रतिसाद पाहता माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंमलबजावणीच्या या टप्प्यावर सहकार आयुक्त यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व मजूर सहकारी संस्थांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ५ अन्वये कारवाई केली किंवा नाही याचा आढावा घेणे जरुरीचे आहे असे आयोगास वाटते तेव्हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी

अंमलबजावणी करिता व या संस्थांच्या कारभारात पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रथमतः त्यांचे कार्यक्षेत्रातील सर्व मजूर सहकारी संस्थांनी जन माहिती अधिका-याची नेमणुका केल्या आहेत किंवा कसे याचा आढावा घ्यावा व संबंधित मजूर सहकारी संस्थेने जर अशा प्रकारच्या नेमणुका केल्या नसतील तर त्यांना सदर नेमणुका एका विशिष्ट कालावधीमध्ये करण्यास भाग पाडावे. त्यानंतर राज्यातील सर्व मजूर सहकारी संस्थाचे जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या याद्या राज्य शासनाच्या /सहकार विभागाच्या वेबसाईटवर / वर्तमानपत्रात प्रसिध्द कराव्या जेणेकरुन सामान्य जनतेला या मजूर संस्थेच्या कारभाराविषयी आवश्यक ती माहिती मिळण्यास मदत होईल.

अपिलार्थीने मागितलेल्या माहितीचे अवलोकन करता अपीलार्थीने त्यांचे मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ३ व्दारे मजूर संस्थेची सर्व कागदपत्र मागितली आहेत सर्व कागदपत्रे म्हणजे अपीलार्थीस नेमके काय हवे आहे याचा यावरुन नक्की बोध होत नाही. त्यामुळे ही माहिती वगळून उर्वरीत माहिती अपीलार्थीस जन माहिती अधिकारी यांना देणे सहज शक्य आहे.

सबब या प्रकरणासंदर्भात असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी महाराणा प्रताप मजूर सहकारी संस्था कन्नड यांनी अपीलार्थीस त्यांनी विचारलेली, मुद्दा क्रमांक ३ वगळता, संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. सदर संस्थेकडून अपीलार्थीस माहिती प्राप्त होत आहे किंवा कसे यावर जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था यांनी नियंत्रण करावे. जर सदर मजूर सहकारी संस्थेने अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती दिली नाही तर या संस्थेची मान्यता काढून घेण्याच्या दृष्टीने तात्काळ आवश्यक ती कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश निर्गमित झाल्यापासून १ महिन्याच्या आत पाठवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांची मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती त्यातील मुद्दा क्रमांक ३ वगळता अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. सदर संस्था अपीलार्थीस आवश्यक ती माहिती देत आहे किंवा कसे हे पाहण्याचे काम जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था औरंगाबाद यांनी करावे. जर सदर संस्थेने ही माहिती अपीलार्थीस विहित मुदतीत पुरविली नाही तर सदर संस्थेवर यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास एक महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुधाकर कारभारी शेजवळ, शिवाजीनगर, कन्नड, तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा चेअरमन, महाराणा प्रताप मजूर सहकारी संस्था (म) ब्राम्हण गल्ली, कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था कन्नड तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, बी. जे. रोड, पुणे – ४११ ००१ (रेल्वे स्टेशन जवळ) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/१९०

निर्णय दिनांक ०४-०७-२००७

श्री. भगवान भानुदासराव बागलाने, : अपीलार्थी

मु. काकडहिरा, पो. पालवन,

तालुका जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील

कार्यालय बीड तालुका जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार बीड जिल्हा बीड

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. भगवान भानुदासराव बागलाने (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार

(महसूल), तहसील कार्यालय बीड तालुका जिल्हा बीड श्री. नारायण धोंडीबा मोरे (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड जिल्हा बीड हे सुनावणीस गैरहजर आहेत याची सखेद नोंद आयोगाने घेतली असून त्यांना आयोगाकडून नोटीस प्राप्त झाल्यानंतर आयोगासमोर त्यांनी हजर होणे अनिवार्य आहे. त्यांनी यापुढे आयोगासमोर सुनावणीसाठी गैरहजर राहणे टाळावे अशी सूचना महसूल आयुक्त औरंगाबाद यांनी त्यांना द्यावी.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थी यांनी त्यांचेकडील दिनांक २३-०३-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे ३ मुद्यांची माहिती मागतिली होती.

> “१) सर्व्हे नंबर ३३ आ तरफ गीराम सन १९५९ ते ६० पाहणीपत्रक जानकाबाई शामराव यांच्या इसार पावतीची नकल.
>
> २) फेर नंबर २७ ची फेरफारची नकल
>
> ३) सन १९४६ ते १९५४ या वर्षात कब्जेदार खाण्यात नावात बदल झालेल्या नकला.”

अपीलार्थीने सदर माहिती शिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपीलार्थीच्या या अर्जाची जन माहिती अधिकारी यांनी दोन महिन्यांनी दखल घेऊन त्यांचेकडील दिनांक २३-०५-२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले. या उत्तरामध्ये मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात अपीलार्थीस ४ रुपये फी चा भरणा करण्यास सांगितले, मुद्दा क्रमांक २ च्या बाबत खरेदीखताची नकल / इसार पावती संबंधित कार्यालयाकडून घेऊन जाण्यास सुचविले (संबंधित कार्यालय म्हणजे कोणते कार्यालय हे नमूद केले नाही) व मुद्दा क्रमांक २ व ३

संदर्भात फेरफार नोंदवही आस्तित्वात नसल्यामुळे नावात बदल झाल्याबाबतची नकल उपलब्ध नसल्याबाबतचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीप्रमाणे त्यांचेकडील दिनांक २०-०५-२००६ या अर्जान्वये जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे जन अपीलीय अधिकारी यांच्या निदर्शनास आणून जन माहिती अधिकारी यांच्यावर शास्तीची कारवाई करण्याची विनंती केली.

जन अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीच्या या अर्जावर कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतली नसल्याचे अपीलार्थी यांनी आज आयोगासमोर सांगितले. त्याच बरोबर आज उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी यांनी या संदर्भात ते, त्यावेळी कार्यरत नसल्यामुळे त्यांना काही सांगता येणार नाही असे सांगितले.

महसूल विभागाच्या अशा प्रकारच्या या थंड प्रतिसादामुळे व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्यक त्यांनी जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये असे असे आढळून आले की, संबंधित उपस्थित जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणा संदर्भातील कोणतेही कागदपत्र उपलब्ध नाही.

त्यांनी सदर पदाचा पदभार दिनांक ०१-०६-२००६ रोजी स्विकृत केला तेव्हापासून या प्रकरणाचे कोणतेही कागदपत्र त्यांच्याकडे आलेले नसल्याचे त्यांनी आयोगासमोर शपथपत्रा व्दारे कबूल केले आहे. आयोगाने बोलावून देखील संबंधित जन अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड यांची अनुपस्थिती, अपीलार्थीस मिळालेली अपूर्ण माहिति व महसूल यंत्रणे कडून दिल्या गेलेली उडवाउडवीची उत्तरे हे पाहता महसूल यंत्रणेचा कारभार या जिल्ह्यामध्ये कसा चालला आहे याची कल्पना करणे फारसे कठीण नाही. जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी महसूल विभागामध्ये कार्यरत आहेत त्यांच्या कार्यक्षेत्रातील जमिनीचे सर्व अभिलेख, त्यांच्या मालकीच्या नोंदी, मालकीमध्ये वेळोवेळी होणारे फेरफाराची नोंद त्यांच्याकडे असणे अनिवार्य आहे. जमिनीच्या मालकीचे, खरेदीविक्रीचे व हस्तांतरणा संदर्भातील अभिलेखे हे शासकीय अभिलेखे जतन करण्यासंदर्भातील सूचनेप्रमाणे 'अ' प्रकारच्या प्रवर्गात मोडतात म्हणजे हे अभिलेखे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कायम स्वरुपी असणे अभिप्रेत आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेली उत्तरे पाहता मुद्दा क्रमांक २ व ३ बाबत त्यांनी अपीलार्थीस माहिती देण्याचे जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केल्याचे व त्याच बरोबर अपीलार्थीस त्यांनी वेळेत माहिती दिली नसल्याचे सिध्द होत आहे कारण अपीलार्थीने दिनांक २०-०५-२००६ रोजी प्रथम अपील झाल्यानंतर अपीलार्थीच्या या अर्जास प्रथम प्रतिसाद दिला तोच मुळी २ महिने इतक्या विलंबाने व जो प्रतिसाद दिला त्या मध्ये फक्त १/३ एवढी माहिती उपलब्ध करुन दिली व उर्वरीत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी टाळले.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला असता या प्रकरणाची कोणतीही कागदपत्रे सध्या कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाहीत यावरुन माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी प्रमाणे केलेल्या सामान्य माणसाच्या अर्जाची जन

माहिती अधिकारी हे कशा प्रकारे विल्हेवाट लावतात याचे ज्वंलत उदाहरण आयोगासमोर उघड झाले आहे. कोणत्याही सुजाण नागरिकास ही घटना उद्विग्न करेल अशीच आहे. यामध्ये एक तर जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा कायदा व त्यातील तरतुदी याबाबत अजिबात ज्ञान नसणे किंवा त्यांचे बेपर्वा वर्तन हे दोनच पर्याय यापुढील विचारासाठी उरतात. या २ पर्यायापैकी कोणत्याही पर्यायाचा विचार केला तरी जन माहिती अधिकारी हे निश्चितपणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २० (२) मधील तरतुदीप्रमाणे त्यांच्या वर प्रचलीत सेवा नियमाप्रमाणे विभागीय चौकशीची शिफारस करण्यास पात्र ठरतात.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी पुढे असे स्पष्ट केले की अपीलार्थीस लागणारी उर्वरीत माहिती ते अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर असे आदेशित करण्यात येत की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसाच्या आत त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ ची संपूर्ण माहिती सांक्षांकीत करुन अपीलार्थीस विनामूल्य पुरवावी.

या प्रकरणी अपीलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्यासंदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या बेपर्वाबद्दल व पर्यायाने त्यांच्या कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांच्या वर महसूल आयुक्त औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवानियम १९७९ (शिस्त व अपील) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे

आदेश त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा असेही त्यांना पुढे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, हे आदेश निर्गमित झाल्यापासून ७ दिवसा च्या आत अपीलार्थी यांनी मागितलेली मुद्दा क्रमांक २ व ३ ची संपूर्ण माहिती सांक्षांकीत करुन विनामूल्य पुरवावी.

३. विहित मुदतीत माहिती देणे संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या बेपर्वाबद्दल व पर्यायाने कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांच्या वर महसूल आयुक्त औरंगाबाद यांनी महाराष्ट्र नागरी सेवानियम १९७९ (शिस्त व अपील) अन्वये शिस्त भंगाची कारवाई करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून ३ महिन्याच्या आत सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भगवान भानुदासराव बागलाने, मु. काकडहिरा, पो. पालवन, तालुका जिल्हा बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय बीड तालुका जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २३१/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०४-०७-२००७.

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील .. अपिलार्थी.
सोनहिरा मोंढारोड, गंगापूर
जिल्हा- औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
तालुका कृषी अधिकारी,
गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२.	जनअपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय कृषी अधिकारी,
वैजापूर., जिल्हा- औरंगाबाद

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री. गजानन विठ्ठल पाटील (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, गंगापूर श्री.पी.आर.चव्हाण, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) व जनअपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, वैजापूर, श्री.बी.आर.गायकवाड, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांचेकडील दिनांक- २७-०४-२००६ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" फलोत्पादन विषयी केंद्र सरकारचा व राज्य सरकारच्या अनुदान विषयक योजनांची माहिती अशा योजना लाभधारक लाभाच्या रक्कमेसह सविस्तर यादी."

अपिलार्थीने दिनांक- ०१-०४-२००४ ते ३१-०३-२००६ या कालावधी संबंधात ही माहिती मागविल्याचे दिसून येते. सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलबध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थी यांनी दिनांक- ०५-०१-२००७ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी प्रथमतः कोणतीही सुनावणी न घेता, जनमाहिती अधिका-यास त्यांच्याकडील दिनांक १२-०१-२००७ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती विनाविलंब देण्याचे सूचीत केले. तद्नंतर जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १३-०२-२००६,२०-०२-२००६ व ०१-०३-२००७ रोजीच्या त्यांच्या पत्रान्वये जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहण्याचे सूचीत केले. तथापि अपिलार्थी हे जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित न राहिल्यामूळे ही सुनावणी होवू शकली नाही, असे जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगा समोर कबुल केले व तसे त्यांनी शपथपत्रावर लिहून दिले आहे. तथापि जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून सुनावणीसाठी अपिलार्थीस पत्र प्राप्त झाले किंवा नाही या संबंधात कोणताही पुरावा जनअपिलीय अधिकारी हे आयोगास दाखल करु शकले नाही.

तद्नंतर अपिलार्थीने, राज्य माहिती आयोगाकडे व्यथीत होवून दिनांक- २१-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीस आजतागायत देखील प्रथम अर्जाव्दारे मागितलेली माहिती प्राप्त झाली नाही, हे सिध्द झाले आहे. त्याचबरोबर जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस खरोखरच सुनावणीस बोलाविले होते किंवा कसे, हे कळण्यासही अपिलार्थी अनुपस्थित असल्यामूळे, मार्ग नाही. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सुनावणीस हजर राहण्याकरिता पाठविलेल्या पत्राचे अवलोकन करता या पत्रावर अपिलार्थी यांचा पुर्णपत्ता लिहीला नसल्याचे आढळून येते. तथापि जनअपिलीय अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीस, अपिलार्थीच्या मूळअर्जावरुन त्यांच्या पत्यावर पत्र पाठविले आहे.

जनअपिलीय अधिकारी यांच्या या म्हणण्यापृष्ठर्थ त्यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील आवक जावक रजिष्टरची प्रत मागितली असता, ती त्यांच्याकडे सुनावणीच्या वेळी उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास सांगितले.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेली माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी अक्षम्य बेपर्वाइ दर्शविल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे अपिलार्थी यांनी देखिल सुनावणीस गैरहजर राहून त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये त्यांना फारसे स्वारस्य नसल्याचे या कृतीव्दारे स्पष्टपणे दर्शविले आहे. जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणीस उपस्थित न राहता, अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दुसरे व्दितीय अपील दाखल करणे, ही त्यांची कृती चुकीची आहे. जनअपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी परत एक संधी देण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी यांना, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन प्रथम अपीलाच्या सुनावणी करिता हजर राहण्याकरिता तात्काळ नोटीस काढावी व जनअपिलीय अधिकारी यांनी ही सुनावणीची नोटीस अपिलार्थीस वेळेत पोंहचेल अशी त्यांनी खात्री करुन या प्रकरणात हे आदेश निर्गमित झाल्यानंतर २१ दिवसाच्या आत सुनावणी घेवून आपला निर्णय द्यावा व तद्नंतर पंधरा दिवसाचे आत आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा. अपिलार्थीने या सुनावणीस स्वतः उपस्थित रहावे व जर जनअपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना मान्य नसेल तर राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणात हे आदेश निर्गमीत झाल्यापासून या प्रकरणात २१ दिवसाच्या आत सुनावणी घेवून निर्णय द्यावा व अनुपालन अहवाल आयोगास अहवाल सादर करावा.

औरंगाबाद
दिनांक- ०४-०७- २००७.

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.गजानन विठ्ठल पाटील, सोनहिरा मोंढारोड, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, गंगापूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, वैजापूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३२

निर्णय दिनांक ०४-०७-२००७

श्री. पांडुरंग गणपतराव निकते (से.नि.शि.), : अपीलार्थी
बर्वे निवास, हाडको, शिवछत्रपतीनगर,
तुळजापूर तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद
उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद उस्मानाबाद

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. पांडुरंग गणपतराव निकते तुळजापूर हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद श्री. शिवाजी मारोतराव जाधव (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद, उस्मानाबाद श्री. भारत सासणे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्या दिनांक १५-११-२००६ च्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे स्वेच्छा निवृत्ती नंतर अंशराशीकरण करण्याबाबत मार्गदर्शन मागितले होते. अपीलार्थीच्या या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी संबंधितास दिनांक २२-११-२००६ रोजी, सदर मार्गदर्शन माहिती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील नियम २ मधील ३ (च) तरतुदीनुसार माहिती अधिकार व्याख्येत बसत नसल्यामुळे अपीलार्थीस त्यांचा अर्ज निकाली काढल्याचे कळविले.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तरावर अपीलार्थी यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांचेकडे दिनांक २०-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी विभागीय आयुक्त औरंगाबाद यांच्याकडे मार्गदर्शन मागितले. अपीलार्थीचे अपील प्राप्त झाल्या नंतर विभागीय आयुक्त औरंगाबाद यांनी अपीलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्याकरिता कोणती पध्दत अवलंबावयाची याचे दिनांक ०२-०१-२००७ च्या पत्रान्वये मार्गदर्शन केले आहे. या पत्राची प्रत त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना दिली. विभागीय आयुक्तांकडून हे पत्र प्राप्त झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी त्यांचेकडील दिनांक ३०-१२-२००६ च्या पत्रान्वये शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना अपीलार्थीच्या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्याची सूचना दिली. त्यानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी दिनांक २२-०३-२००७ च्या पत्रा अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४ नुसार १५ वर्षानंतर पुन्हा अंशराशीकरण करण्याबाबतची तरतूद नसल्याचे अपीलार्थी यांना कळविले आहे. तथापि सदर मार्गदर्शन प्राप्त होण्यापुर्वीच

अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०२-२००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रा वरुन असे दिसून येते की, अपीलार्थी यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेले मार्गदर्शन आता त्यांना प्राप्त झाले आहे तथापि अपीलार्थीने प्रथम अर्ज केल्यानंतर त्यानंतर लागलीच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद यांनी आवश्यक ते मार्गदर्शन केले असते तर अपीलार्थीस पुढील पत्रव्यवहार करावा लागला नसता. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियमामधील नियमावर बोट ठेऊन अपीलार्थीस माहिती देण्याचे नाकारले हे जरी तांत्रिकदृष्ट्या बरोबर असले तरी येथून पुढे अशा किरकोळ अर्जास त्यांनी त्यातील गर्भित आशय ध्यानात घेऊन अशा अर्जाचा निपटारा करावा असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. पांडुरंग गणपतराव निकते (से.नि.शि.), बर्वे निवास, हाडको, शिवछत्रपती नगर, तुळजापूर तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४२

निर्णय दिनांक ०४-०७-२००७

श्री. कांतराव कुंडलिकराव जाधव, : अपीलार्थी

मु. पो. ईसारवाडी तालुका पैठण

जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :

तथा तहसीलदार पैठण तालुका पैठण

जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद
जिल्हा औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. कांतराव कुंडलिकराव जाधव हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार पैठण जिल्हा औरंगाबाद श्री. केशव नेटके (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद श्री. आण्णासाहेब शिंदे (यापुढे त्यांना जन अपीलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपीलार्थीने त्यांच्याकडील दिनांक २४-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून, "सन २००० ते २००१ या कालावधीतील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्या आदेशावरुन पुनर्वसन भूखंड मंजुरी बाबतच्या आदेशाची माहिती मागविली होती. त्याच बरोबर जिल्हा पुनर्वसन अधिकारी औरंगाबाद यांच्या कार्यालयात भूखंड अर्ज देण्याअगोदर आपल्या कार्यालयाकडून भूखंड मंजूरीबाबत प्रस्ताव कोणत्या कागदपत्राआधारे सादर करण्यात आला त्याची माहिती व शासनाच्या नियमाची तरतुद" याबाबतची माहिती मागविली होती.

सदर माहितीचा कालावधी अपीलार्थीने सन २००० ते २००१ असा दर्शविला आहे.

अपीलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १८-०३-२००६ रोजी अपीलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती पुरविली. त्याच बरोबर अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जामध्ये अपीलार्थीस नक्की

कोणती माहिती हवी आहे त्याचा अर्थबोध होत नसल्याचे व या संदर्भात अपीलार्थीस चर्चा करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात त्यांनी बोलाविले होते. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एकूण ४२ पानाची माहिती दिली आहे. ही माहिती देण्यापोटी लागणारे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात भरुन घेतले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपीलार्थीचे समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (१) मधील तरतुदी नुसार दिनांक ३१-०३-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती न देता अपूर्ण माहिती दिली असे नमूद केले आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी यावर दिनांक १७-०४-२००६ रोजी प्रथम सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना अपीलार्थीस या प्रकरणात उपलब्ध असलेल्या कागदपत्राच्या प्रती तात्काळ देण्याची सूचना केली व अपीलार्थीचे अपील निकाली काढले. सुनावणीच्या दिवशी अपीलार्थीस जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे या प्रकरणा संदर्भात असलेल्या सर्व नस्त्या दाखविण्यात आल्या असे जन अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०१-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या अपीलामध्ये देखील अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे व जन अपीलीय अधिकारी यांची सूचना प्राप्त होऊनही अपीलार्थीस माहिती मिळाली नसल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडून असा युक्तीवाद मांडला की या पुनर्वसन प्रकरणातील नस्तीच्या सर्व पृष्ठांच्या झेरॉक्स प्रत काढून अपीलार्थीस त्या पुरविल्या आहेत व

त्यांच्याकडे उपलब्ध असलेली सर्व माहिती अपीलार्थीस योग्य ते शुल्क आकारुन यापुर्वीच पुरविली आहे तथापि अपीलार्थी यांनी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलमेमोवरुन अद्यापही त्यांना ११ मुद्दयावर माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

अद्यापही माहिती अप्राप्त असलेले मुद्दे म्हणजे क्रमांक १ ख, २ ब, ४, ५ अ, ७ अ, ८ अ, ९ ग, १० अ, १२, १३ व १४ हे आहेत. जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की या ११ मुद्यावरील माहिती त्यांनी त्यांच्या कार्यालयात सात दिवसाचे आत परत शोधावी व सदर माहिती अपीलार्थीस दिली नसल्यास ती त्यांना लागलीच विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अद्यापही माहिती अप्राप्त असलेले मुद्दे क्रमांक १ ख, २ ब, ४, ५ अ, ७ अ, ८ अ, ९ ग, १० अ, १२, १३ व १४ या ११ मुद्यावरील माहिती त्यांच्या कार्यालयात हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाचे आत परत शोधावी व सदर माहिती अपीलार्थीस पुर्वी दिली नसल्यास आता ती हे आदेश निर्गमित झाल्यापासून दहा दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कांतराव कुंडलिकराव जाधव, मु. पो. ईसारवाडी तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार पैठण तालुका पैठण जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/ २४३/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०४-०७-२००७.

१. श्री.अनिल नानाराव पाटील, .. अपिलार्थी.
राहणार- जांभळी, तालूका- पैठण
जिल्हा- औरंगाबाद.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
तहसीलदार, पैठण.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०४-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.अनिल नानाराव पाटील, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ) गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण, श्री.केशव नेटके ( येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल ) व जन अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद, श्री. आण्णसाहेब शिंदे, ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- २०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून खालील प्रमाणे माहिती मागविली आहे.

> “ छायाबाई रघुनाथ गाडेकर यांनी गटनंबर ११ मौजे- जांभळी, येथील बेकायदेशीर आंब्याचे झाड तोडले असून सदर प्रकरणी अद्यापपर्यंत गुन्हा दाखल झालेला नसून त्याप्रमाणे आपल्या कार्यालयातील मंडळ अधिकारी बीडकीन यांनी दिनांक- ०८-०७-२००४ रोजी पंचनामा सादर केला असून आपल्या कार्यालयाने छगाबाई यांच्यावर का कार्यवाही केली नाही, याची माहिती देण्यात यावी. द्यावी.”

सदर मागणी अपिलार्थीने प्रत्यक्ष अपेक्षिली होती.

अर्जासोबत अपिलार्थीने पंचनाम्याची प्रत जोडल्याचे सदर अर्जात म्हटले आहे. तथापि सदर प्रत आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये दिसून येत नाही. त्याच प्रमाणे सदर पंचनाम्याची प्रत जनमाहिती अधिकारी यांच्याकडे सुध्दा सादर केलेली नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगास सांगितले.

अपिलार्थीच्या या अर्जावर सवंबंधितावर दंडनीय कार्यवाही प्रस्तावीत केली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- १९-०४-२००६ रोजी कळविले. तथापि जनमाहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करुनही वेळेत अपेक्षित माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २८-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे.

अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- १७-०४-२००६ रोजी सुनावणी घेतली व जनमाहिती अधिका-यास अपिलार्थी यांनी विचारलेली माहिती त्यांना कळवावी, असे त्यांनी आदेशित केले.

जनअपिलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १९-०४-२००६ रोजी अपिलार्थीस सदर प्रकरणाची सद्यस्थिती कळविल्याचे दिसून येते.

जनअपिलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस अपेक्षीत माहिती न मिळाल्यामूळे त्यांनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १०-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी आली मूळ अर्जाव्दारे केलेली माहितीची मागणी कायम ठेवून बेकायदेशीररित्या अंब्याचे झाड तोडल्या बद्दल संबंधितांवर दंडात्मक कार्यवाही करण्याचे आदेश देण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर श्रीमती छगाबाई रघुनाथ गाडेकर यांनी बेकायदेशिरपणे गट नंबर ११ मधील आंब्याचे झाड तोडल्या बद्दल काय कार्यवाही करण्यात आली, याची त्यांना माहिती मिळाली नसल्याचे नमूद केले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी गैरहजर आहेत. जनअपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे स्पष्ट केले की, विनापरवानगी झाडे तोडल्यास शास्ती लावण्याचे अधिकार उपविभागीय अधिकारी यांचे आहेत. हे अधिकार तहसीलदार यांना नाहीत. त्यामूळे त्यांची भूमीका या प्रकरणी फक्त कार्यवाही प्रस्तावित करणे इतपतच असू शकते. त्यांनी आयोगास असेही निदर्शनास आणून दिले की, हे अधिकार त्यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५ व महाराष्ट्र झाडे तोडणे (नियमन) अधिनियम १९६४ चे कलम ३ नुसार प्राप्त झाले आहेत.तसेच या प्रकरणी याच कलमाखाली उपविभागीय अधिकारी यांनी श्रीमती छगाबाई गाडेकर यांना या कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दिनांक- ०९-११-२००६ रोजी १,०००/- रुपये इतका दंड लावून सदर दंडाची वसुली संबंधिताकडून करुन घेण्यासाठी संबंधीत तलाठी यांना आदेशीत करण्यात आले आहे.असे सांगून पुढे जर संबंधिताकडून दंड वसूल झाला नाही तर सदर रक्कमेचा बोजा श्रीमती छगाबाई यांच्या ७/१२ वर टाकण्यात येईल. असे आयोगा समोर स्पष्ट केले.

सदर रक्कमेचा बोजा श्रीमती छगाबाई गाडेकर यांच्या ७/१२ वर लावला नसेल तर तो लावण्यासाठी एक महिना इतका कालावधी लागेल. असे पुढे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर स्पष्ट केले. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगास उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, त्यांनी या प्रकरणी, नियमाप्रमाणे जी कार्यवाही त्यांना करता येणे शक्य आहे, ती सर्व कार्यवाही केली आहे. तेंव्हा असे आदेशित करण्यात येते की, या प्रकरणी श्रीमती छगाबाई रघुनाथ गाडेकर यांच्यावर उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी लावलेला १,०००/- रुपये इतक्या दंडाची शास्ती

त्यांच्याकडून वसूल करुन घ्यावी व सदर वसुली न झाल्यास सदर दंडाचा बोजा संबंधिताच्या ७/१२ वर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत लावावा व तदनंतर सात दिवसाचे आत त्यांनी केलेली अंतिम कार्यवाही अपिलार्थीस कळविण्यात यावी. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२. अपील निकाली काढण्यात येत आहे.

३. श्रीमती छगाबाई गाडेकर यांच्यावर उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी लावलेला १,०००/- रुपये इतक्या दंडाची शास्ती त्यांच्याकडून वसूल करुन घ्यावी वसूली न झाल्यास सदर दंडाचा बोजा संबंधिताच्या ७/१२ वर, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून एक महिन्याच्या आत लावावी व तदनंतर सात दिवसात त्यांनी केलेली अंतिम कार्यवाही अपिलार्थीस कळविण्यात यावी.

औरंगाबाद
दिनांक ०४-०७-२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.अनिल नानाराव पाटील, राहणार- जांभळी, तालूका- पैठण, जि-औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, पैठण यांना, वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांना, वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २४५/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०५-०७-२००७.

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिपक गणपतराव बडगीरे<br>मु.पो.सोनावती,<br>तालूका जिल्हा- लातुर | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | |
|---|---|---|
| १. जनमाहिती अधिकारी तथा<br>मंडळ कृषी अधिकारी,<br>कृषी विभाग, लातूर. | .. | प्रतिवादी |
| २. जनअपिलिय अधिकारी तथा<br>तालुका कृषी अधिकारी,<br>लातूर. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.दिपक गणपतराव बडगीरे, (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जनमाहिती अधिकारी तथा मंडळ तालुका कृषी अधिकारी, कृषी विभाग लातूर (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात

येईल.) हे दोघेही गैरहजर आहेत. जनअपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, लातूर, श्री.डी.सी.सोळुंके, (येथून पुढे त्यांना जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- २५-१०-२००५ रोजीच्या पत्रान्वये कृषी अधिकारी, कृषी विभाग, लातूर यांच्याकडे ( जे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी आहेत ) लातूर तालुक्यातील सन २००३ ते २००५ या कालावधीतील कृषी विभागाच्या संबंधीत माहिती मागविली होती. या माहितीमध्ये - सन २००३-२००५ च्या दरम्यान लातूर तालुक्यात जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयामार्फत गावोगावी शेततळी झाली आहेत. ज्या गावात व शेतक-यांच्या शेतात अशी शेततळी झाली आहेत. त्या शेतक-याचे व गावाचे नाव, शेततळयाची यादी व त्याच बरोबर ही शेततळे मजूरामार्फत झाली किंवा मशीन मार्फत झाली. याचा खुलासा त्यांनी या माहिती अर्जामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे मागितला आहे.

सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तीशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार विहीत मुदतीत कोणतीही कार्यवाही केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

**जनमाहिती अधिकारी यांचेकडून सदर माहिती प्राप्त न झाल्यामूळे अपिलाथी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनाक- १२-०१-२००६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीस अनुसरुन त्यांच्याकडे प्रथम अपील**

**केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी आपल्या मुळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे. सदर अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही. जनअपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक- २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, त्यांच्या अधिपत्या खालील एकूण तीन मंडळ कृषी अधिका-या पैकी मंडळ कृषी अधिकारी लातूर व मुरुड यांच्याशी संबंधीत माहिती त्यांच्या कार्यालयात दिनांक- ०७-०२-२००६ रोजी उपलब्ध राज्य माहिती आयुक्त,**

**औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

**२००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२०४

निर्णय दिनांक ०५-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. मुंडे युवराज तुळशीराम,<br>वसंत भवन, मारोती मंदिराजवळ,<br>शिवाजीनगर, नांदेड | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय अधिकारी,<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड | : | |
| २ जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हाधिकारी नांदेड | : | प्रतिवादी |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. युवराज तुळशीराम मुंडे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड श्री. जगदीश गोपीकिशन मिनीयार (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी नांदेड हे सुनावणीस अनुपस्थित आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्वप्रथम त्यांचेकडील दिनांक २६-१२-२००५ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे " ग्यानबा गंगाराम बुक्तरे यांच्या १४ ऑगस्ट २००५ पासून च्या आमरण उपोषणाच्या अनुषंगाने १५-०८-२००५ पासून ते २६-१२-२००५ पर्यत त्यांच्या कार्यालयाने काय कारवाई केली " याबाबतची माहिती मागविली होती.

सदर माहिती अपीलार्थीने नोंदणीकृत शिघ्र टपालाव्दारे मागविली होती.

अपीलार्थीच्या सदर अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक १७-०३-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस पाठविलेल्या या पत्रामध्ये श्री. ग्यानबा गंगाराम बुक्तरे यांनी ज्या मागण्याकरिता आमरण उपोषणाचा मार्ग पत्कारला त्याचा परामर्श घेतला. श्री. ग्यानबा गंगाराम बुक्तरे यांनी एकूण ६ मागण्या करिता आमरण उपोषण सुरु केले होते. तदनंतर त्यांनी १५ ऑगस्ट २००५ रोजी आपले उपोषण समाप्त केले. श्री. बुक्तरे यांच्या एकूण ६ मागण्या पैकी ३ मागण्या महसूल विभागाशी संबंधित असून ३ मागण्या पोलीस विभागाशी संबंधित आहेत. महसूल विभागाच्या मागण्या संदर्भात सखोल चौकशी करता जन माहिती अधिकारी यांना असे आढळून आले आहे की, श्री. ग्यानबा गंगाराम बुक्तरे यांच्या मौजे मरळक बु. तालुका नांदेड यांच्या जमीनीच्या मालकी नोंदीमध्ये सर्व्हे नंबरच्या एकत्रीकरणाच्या वेळी चूक होऊन त्यांचे

नाव ७/१२ च्या उता-यावरुन कमी झाले आहे.  मूळ भूखंड श्री. बुक्तरे यांच्या मालकीचा असतांना जमीन एकत्री करणाच्या वेळी मात्र त्यांच्या नावाची मालकीची नोंद नसणे ही संबंधित एकत्रीकरण अधिका-याने केलेली चूक आहे असे जन माहिती अधिका-याने सांगितले आहे.  संबंधित मुद्दा एकत्रीकरण अधिकारी यांच्याशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस संबंधित एकत्रीकरण अधिका-याकडे जाण्यास सुचित केले. एकत्रीकरण अधिका-यावर वेगळ्या प्राधिकरणाचे म्हणजेच जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नियंत्रण असते त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस एकत्रीकरण अधिकारी यांच्याकडे जाण्याची सूचना दिली.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील उत्तराने समाधान न झाल्याने अपीलार्थीने दिनांक ०८-०२-२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले.

जन अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन त्यांच्याकडील दिनांक १७-०५-२००६ च्या आदेशान्वये या प्रकरणाबद्दल निकाल दिला.  या निकालामध्ये त्यांनी अपीलार्थीचे अपील फेटाळले.  हे अपील फेटाळतांना जन अपीलीय अधिकारी यांनी असे म्हटले आहे की, अपीलार्थीच्या मूळ अर्जाची पाहणी केली असता अपीलार्थीने कार्यालयात उपलब्ध असलेल्या कसल्याही प्रकारची माहिती मागितली नाही परंतु श्री. बुक्तरे यांच्या उपोषणाबाबत झालेल्या कारवाईची माहिती मागितली.  श्री. बुक्तरे यांनी त्यांच्या ज्या मागण्याकरिता उपोषण केले आहे त्यापैकी ३ मागण्या एकत्रीकरण अधिकारी व ३ मागण्या पोलीस विभागाशी संबंधित असल्यामुळे महसूल विभागाकडून काहीही कारवाई अपेक्षित नसल्याने अपीलामध्ये तथ्य दिसून येत नाही असा जन अपीलीय अधिकारी यांनी निष्कर्ष काढला आहे व या निष्कर्षावर त्यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळले आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या या निर्णयाने व्यथित होऊन अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) मधील तरतुदी नुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०६-२००६ रोजी व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी, जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून अपेक्षित व आवश्यक ती माहिती मिळाली नसल्याचे दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांनी असा मुद्दा मांडला की त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. बुक्तरे यांच्या उपोषणावर केलेल्या कारवाईचा अहवाल मागितला होता तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन श्री. बुक्तरे यांच्या उपोषणा संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयाकडून काय कारवाई झाली याचा बोध होत नाही व ते या प्रकरणी फारसे सांगू शकले नाहीत तथापि श्री. बुक्तरे यांनी ज्या मागण्या करिता उपोषण केले त्या मागण्या संदर्भात त्यांनी वर विवेचन केल्याप्रमाणे माहिती दिली. या ठिकाणी अपीलार्थीस बुक्तरे यांच्या उपोषण संदर्भात निश्चितपणे काय कारवाई झाली त्याची माहिती हवी होती. अपीलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, श्री. बुक्तरे यांच्या मागण्यांच्या अनुपालनासंदर्भात त्यांना माहितीची गरज नाही. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी, जन अपीलीय अधिकारी व जिल्हाधिकारी नांदेड यांनी श्री. बुक्तरे यांच्या दिनांक १४-०८-२००५ च्या उपोषणानंतर या प्रकरणात निश्चित काय कारवाई झाली त्याची माहिती अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्या नंतर ३ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे उपलब्ध करुन देण्यात यावी व तदनंतर जर सदर मागण्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित नसतील तर या मागण्या ज्या विभागाशी संबंधित आहे त्या विभागाकडे सदर निवेदनाची प्रत पाठवून त्याच्या अनुपालना करिता कसोशीने प्रयत्न करावेत. सुनावणी च्या वेळी अपीलार्थी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात या प्रकरणाशी संबंधित असलेली नस्ती पाहण्याची मागणी केली या संदर्भात असे आदेशित करण्यात येते की, जिल्हाधिकारी नांदेड

यांनी या प्रकरणातील संपूर्ण नस्ती अपीलार्थी यांना, त्यांनी तशी लेखी विनंती केल्यापासून ७ दिवसाच्या आत, त्यांना पाहण्यासाठी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचे पालन करुन, उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी, जन अपीलीय अधिकारी व जिल्हाधिकारी नांदेड यांनी श्री. बुक्करे यांच्या दिनांक १४-०८-२००५ च्या उपोषणानंतर या प्रकरणात निश्चित काय कारवाई झाली त्याची माहिती अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्या नंतर ३ दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाव्दारे उपलब्ध करुन देण्यात यावी.

३. जिल्हाधिकारी नांदेड यांनी या प्रकरणातील संपूर्ण नस्ती अपीलार्थी यांना, त्यांनी तशी लेखी विनंती केल्यापासून, ७ दिवसाच्या आत, त्यांना पाहण्यासाठी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीचे पालन करुन, उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुंडे युवराज तुळशीराम, वसंत भवन, मारोती मंदिराजवळ, शिवाजीनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हाधिकारी नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती

करुन ठेवण्यात आली आहे व ती अपिलार्थीने, सदर माहिती व्यक्तीशः घेवून जाण्याचे सूचीत केले आहे. उर्वरीत मंडळ कृषी अधिकारी, गातेगांव यांच्याकडील माहिती मात्र जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे त्या वेळेत उपलब्ध नसावी, असे अनुमान या पत्रावरुन निघते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस गातेगाव येथून अपिलार्थीने अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन घेण्याचे सूचीत केले आहे.

जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामुळे व्यथित होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपिलार्थीने आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची व त्यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थी व संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोघेही गैरहजर आहेत. अपिलार्थीस दिनांक- २५-१०-२००५ रोजी मागितलेली माहिती जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-०३-२००६ रोजी अर्धवट स्वरुपात उपलब्ध करुन दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. अपिलार्थीने एकूण तीन मंडळ कृषी

अधिकारी यांच्याशी संबंधीत  माहिती मागविली असतांना अपिलार्थीस फक्त दोन कृषी मंडळ अधिका-याच्या संबंधातील माहिती दिनांक- ०७-०२-२००६ रोजी उपलब्ध असल्याचे दिनांक- २७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनअपिलीय अधिकारी यांनी कळविले व एका  मंडळ कृषी अधिका-यास संबंधीत माहिती अपिलार्थीस त्यांच्याकडून परस्पर हस्तगत करण्याचे कळविले, त्यांची ही कृती चूकीची आहे.

या प्रकरणी संबंधीत मंडळ कृषी अधिकारी हे जनमाहिती अधिकारी आहेत, असे जनअपिलीय अधिकारी यांनी आज झालेल्या सुनावणीमध्ये सांगितले. वास्तविकतः ज्या वेळी सदर अर्ज लातूर कृषी अधिकारी यांना प्राप्त झाला व अपिलार्थीस लातूर तालुक्यातील म्हणजेच एकूण तीन मंडळ कृषी अधिका-यांकडून माहिती अपेक्षित असतांना, त्यावेळी जास्तीतजास्त पाच दिवसाच्या आत त्यांनी सदर अर्जाच्या प्रती उर्वरित मंडळ कृषी अधिकारी, गातेगाव व मुरुड यांच्याकडे पाठवावयास हव्या होत्या. तथापि त्यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. एवढेच नव्हे तर अपिलार्थीस दिनांक- २५-१०-२००५ रोजी मागितलेली माहिती अपिलार्थीस दिनांक- ०७-०२-२००६ रोजी  उपलब्ध असल्याचे पत्र जे जनमाहिती अधिका-याने देणे आवश्यक आहे, हे देखील जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- २७-०३-२००६ रोजी पाठविल्याचे दिसते.

अपिलार्थीने मागितलेली माहिती कृषी विभागातील मंडळ कृषी अधिकारी यांच्याकडून किती  बेपर्वाइने हाताळली जाते, याचे हे प्रकरण म्हणजे मूर्तीमंत उदाहरण आहे.अपिलार्थीच्या माहितीच्या अर्जास जनमाहिती अधिकारी यांनी मूळीच प्रथम प्रतिसाद  दिला नाही व अपिलार्थीस जी माहिती जनअपिलीय अधिका-यांनी दिली ती देखील अपूर्ण. अपिलार्थीने मागीतलेल्या माहितीचे स्वरुप पाहता ते अगदी साधे आहे. तथापि एवढी साधी माहिती देखिल

अपिलार्थीस न देण्यामागे जनमाहिती अधिकारी यांची कोणतीही भूमिका समर्थनीय असू शकत नाही. जनमाहिती अधिका-यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न देवून आपल्या अक्षम्य बेपर्वाईचे आयोगा समोर प्रदर्शन केल्याचे यामुळे निःसंशय सिध्द होत आहे.

अपिलार्थीने प्रथम अपील केल्यानंतर त्याची सुनावणीही न घेवून जन अपिलीय अधिका-याने आपली अकार्यक्षमता या प्रकरणी दाखविली आहे. त्यांच्या या वर्तनाची यथायोग्य नोंद, सचिव, (कृषी) मंत्रालय, मुंबई यांनी घ्यावी. त्याचबरबोबर अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देण्यापोटी ज्या जनमाहिती अधिका-यांनी, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ मध्ये निर्देशीत केल्याप्रमाणे विहित कालावधी पेक्षा, जास्त कालावधी लावला. त्या जनमाहिती अधिका-यांच्या विरुध्द सचिव, (कृषी) मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदी अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करुन आपला अहवाल, हे आदेश निर्गमीत झाल्यापासून चार महिन्याच्या आत आयोगास सादर करावा. तद्‌वतच जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस गातेगाव येथील गावतळ्या संदर्भातील त्यांनी विचारलेली माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असेही पुढे आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. अपिलार्थीस गातेगाव येथील गावतळया संदर्भातील त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागितलेली सर्व माहिती हे आदेश निर्गमीत झाल्यापासून सात दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

४. या प्रकरणातील सर्व जनमाहिती अधिका-यांच्या विरुध्द सचिव, (कृषी) मंत्रालय, मुंबई यांनी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदी अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करुन आपला अहवाल हे आदेश निर्गमीत झाल्यापासून चार महिन्याच्या आत आयोगास पाठवावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**

दिनांक- ०५-०७- २००७. **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.गजानन विठ्ठल पाटील, सोनहिरा मोंढारोड, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२ जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, गंगापूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, वैजापूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव (कृषी) मंत्रालय, मुंबई-३२ यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई- ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

८ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय

इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

९ निर्णय नस्ती

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२०

निर्णय दिनांक ०५-०७-२००७

श्री. मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड : अपीलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परभणी जिल्हा परभणी :

२ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी जिल्हा परभणी : प्रतिवादी

### विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा नायब

तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परभणी जिल्हा परभणी श्री. किशोर देशमुख (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी जिल्हा परभणी श्री. जे. एस. पवार (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्या कडील दिनांक १०-०२-२००६ च्या अर्जान्वये " परभणी तालुक्यातील एकूण अर्धघाऊक रॉकेल विक्रेते व त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानेधारक यांना शासनाकडून महिनेवारी वितरण होत असलेल्या वितरण व स्टॉक रजिस्टरची सत्यप्रत मिळणेबाबत " जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली होती.

माहितीशी संबंधित कालावधी ०१ जानेवारी २००४ ते ३१ जानेवारी २००६ असा असून ती माहिती अपीलार्थीने नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

सदर माहितीचा अर्ज अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला होता. सदर दिनांक १०-०२-२००६ चा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी आज शपथपत्र आयोगासमोर सादर केले.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून काहीच माहिती प्राप्त न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) मधील तरतुदीनुसार जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले आहे. त्या अपीलामध्ये त्यांनी आपल्या माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

सदर अपील अर्ज अपीलार्थीने पोस्टाने पाठविला होता असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे तर सदर अपील अर्ज जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयास प्राप्त न झाल्याचे जन अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या या म्हणण्यापृष्ठ्यर्थ राज्य माहिती आयोगाकडे त्याप्रमाणे शपथपत्र सादर केले आहे.

जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. राज्य माहिती आयोगाकडे अपील करण्याचे कारण म्हणजे त्यांना जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यापोटी करण्यात येत असलेली टाळाटाळ असे दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपीलार्थी यांचा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेला मूळ अर्ज यावरील अपिल अर्जाची प्रत अनुक्रमे जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांना प्राप्त न झाल्याचे त्यांनी शपथपत्राव्दारे कबूल केले आहे. तर अपीलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्या कडील दोन्ही अर्ज जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिल्याचा पुरावा त्यांच्याकडे उपलब्ध आहे तथापि सदर पुरावा अपीलार्थी हे आज सुनावणीस येथे सादर करु शकले नाही.

दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकून घेतला असता असे आदेशित करण्यात येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अपीलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस, त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती हे आदेश निर्गमित झाल्यापासून ८ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महमद एकबाल पिता महमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, परभणी जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, परभणी जिल्हा परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २२१/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०५-०७-२००७.

१. श्री.मुदखेडकर महंमद .. अपिलार्थी.
पिता मोहंमद युसूफ,
मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त,
मिलकार्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी

नायब तहसीलदार (पुरवठा विभाग)
तहसील कार्यालय, पुर्णा
जिल्हा- परभणी.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
तहसीलदार, पुर्णा,
जिल्हा- परभणी.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.मुदखेडकर महंमद पिता मोहंमद युसूफ, ( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ), जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा विभाग) तहसील कार्यालय, पुर्णा, श्री.एस.डी.मांडवगेड, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, पुर्णा, श्री. टि.एच.जाधव, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक- १०-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडून पूर्णा तालुकयातील एकुण अर्धघाऊक विक्रेते व त्यांना संलग्न असलेले किरकोळ रॉकेल परवानाधारक याना शासनाकडून होत असलेले वितरण व स्टॉक रजिस्टरची सत्यप्रत इत्यादी माहिती मागविली होती.

अपिलार्थीने ही मागणी रजिष्टर टपालाने मागितली आहे

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर आज सादर केलेल्या खुलाशावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा अर्ज

जनमाहिती अधिकारी यांच्या निदर्शनास  संबंधीत अव्वलकारकून (पुरवठा) यांनी आणला नाही किंबहूना अपिलार्थीने अर्ज केला ही बाब त्यांना आयोगाकडून सुनावणीची नोटीस आल्यानंतरच प्रथम समजली, असे त्यांनी सांगितले. या अर्जा संदर्भात त्यांनी त्यांच्या कार्यालयात चौकशी करता, हे प्रकरण हाताळणारे अव्वल-कारकून यांचे स्पष्टीकरण मागविले असता संबंधित अव्वल कारकून यांनी असे स्पष्टीकरण दिले आहे की, सदर माहिती देण्यापोटी येणारा खर्च म्हणून २००० रुपये जनमाहिती अधिकाकरी यांच्या कार्यालयात भरण्यासाठी संबंधीतांनी (अव्वल कारकून) अपिलार्थीस त्यांचेकडील पत्र दिनांक- २२-०६-२००६ अन्वये कळविले होते. तथापि सदर रक्कम अपिलार्थीकडून प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस ही माहिती ते देवू शकले नाहीत अव्वल कारकूनाचे म्हणणे जरी खरे मानले तरी अपिलार्थीस त्यांनी अपिलार्थीने अर्ज केलेल्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत माहिती पुरविण्या संदर्भात कार्यवाही करणे  अपेक्षित होते. तथापि त्यांनी देखिल अपिलार्थीच्या माहिती मागणीच्या अर्जाची दखल ३ महिने १३ दिवस इतक्या विलंबाने घेतली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस संबंधित कार्यालयाचे २२-०६-२००६ चे पत्र प्राप्त झाले किंवा कसे हे विचारले असता, त्यांनी हे पत्र त्यांना प्राप्त झाले नसल्याचे सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती  प्राप्त न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३१-०३-२००६ रोजी प्रथम अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर उपस्थित जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे सुनावणी केंव्हा झाली, याची विचारणा केली असता, उपस्थित जनमाहिती अधिकारी यांनी या अपीलअर्जाची सुनावणी झाली नसल्याचे  सांगितले व जनअपिलीय

अधिकारी यांनी ते या कार्यालयात दिनांक- १२-०६-२००७ रोजी म्हणजेच नुकतेच तहसीलदार, पुर्णा म्हणून कामावर रुजू झाले असल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले. प्रथम अपीलाची सुनावणी झाली किंवा कसे, याबद्दल त्यांना काही माहिती नसल्याचे त्यांनी आयोगास स्पष्ट केले.

जनमाहिती अधिकारी व जपअपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्यामूळे व्यथित होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०५-२००६ रोजीच्या अर्जाने व्दितीय अपील केले आहे. हया अपीलामध्ये देखील अपिलार्थीने त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असून त्यांना ही माहिती देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी जाणूनबूजून टाळाटाळ केली, असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे महसूल विभागाकडे बरेच कामे असून त्यांना त्याप्रित्यर्थ गावोगावी दौरे काढावी लागतात. वरिष्ठ अधिका-यांच्या बैठकीस उपस्थित राहावे लागते, इत्यादी बाबींचा उल्लेख केला आहे व सदर माहिती अपिलार्थीस देण्याचे त्यांनी मुद्दाम होवून टाळाटाळ केली नसल्याचे प्रतिपादन केले.

आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने तहसीलदार जे या प्रकरणी जनअपिलीय अधिकारी आहेत. त्यांच्याकडून देखिल जाणून बुजून टाळाटाळ व विलंब झाली असल्याचे अपीलअर्जामध्ये नमूद केले आहे. याबाबत जनअपिलीय अधिकारी यांनी असे शपथपत्रा व्दारे लेखी निवेदन सादर केले आहे की, “२००६ मध्ये ६२ ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणूका होत्या तसेच अतिवृष्टी व

इतर महसूल कामे व त्या प्रमाणांत असलेला अपूरा कर्मचारीवर्ग तसेच रॉकेलचे किरकोळ विक्रेते हे ग्रामीण भागामध्ये असल्यामूळे त्यांच्याकडून सतत तगादा करुन ही माहिती विलंबाने प्राप्त झाली असल्यामूळे अपिलार्थीस माहिती देण्यास विलंब झाली आहे. त्याचबरोबर अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जाणुनबुजून सदर माहिती उशिरा देणे किंवा टाळाटाळ करणे, यामध्ये कोणीही दोषी नाही. ''

जनअपिलीय अधिकारी यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अपिलार्थी यांनी आता अपेक्षित असलेली माहिती दिनांक- ३०-०६-२००७ रोजी प्राप्त झाली आहे. त्याप्रित्यर्थ अपिलार्थी यांनी, तहसीलदार, पुर्णा यांच्याकडे माहिती मिळाल्याची लेखी पोंच दिली असून त्यासंदर्भात त्यांची कोणतीही तक्रार नसल्याचे या पोंचपावतीत नमूद केले आहे.

अपिलार्थीस जरी आता माहिती मिळाली असली तरी ती एक वर्ष चार महिने व एकोणीस दिवस इतक्या उशिराने प्राप्त झाली. ही बाब नजरेआड करुन चालणार नाही. सामान्य नागरीकाकडून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी अन्वये ज्यावेळी शासकीय यंत्रणेकडे माहितीसाठीचा अर्ज प्राप्त होत असतात, त्या अर्जावर माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ मधील तरतुदी अन्वये कार्यवाही न करण्याची जनमाहिती अधिकारी यांची कृती त्यांच्या कार्यालयाचा निष्काळजीपणा व बेपर्वाइचे दर्शन घडवीते. आयोगाच्या मते ही सर्व जबाबदारी सर्वसाधारण परिस्थीतीमध्ये कार्यालय प्रमुख म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेबरोबर पडते. त्यांचे कार्यालयातील संबंधित अव्वल कारकूनाने हा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास, वर्षभर न आणणे ही बाबच मुळी उद्‌विग्न करणारी आहे. कार्यालयातील आपल्या हाताखालील कर्मचा-यांवर आवश्यक ते प्रशासकीय नियंत्रण नसणे, ही बाब संबंधित जनमाहिती अधिका-यास निश्चितपणे भूषणावह नाही. असे

आयोगाचे मत आहे. या प्रकरणामध्ये स्वतः नायब तहसिलदार व त्यांचे अव्वल कारकून हे किती प्रमाणात जबाबदार आहेत. यांची निश्चिती जिल्हाधिकारी, परभणी यांनी करुन, या चौकशीमध्ये जे कोणी अधिकारी/ कर्मचारी दोषी ठरतील त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी / प्रस्तावित करावी व आपला अहवाल आयोगास तीन महिन्याच्या आत सादर करावा. असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेंचनासह अपिलार्थीचे सदर अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

४. अपील निकाली काढण्यात येत आहे.

५. अपिलार्थीस वेळेवर माहिती न देण्यामध्ये निश्चीतपणे कोण जबाबदार होते, त्यांची निश्चिती जिल्हाधिकारी, परभणी यांनी करुन, या चौकशीअंती जे कोणी अधिकारी/ कर्मचारी दोषी ठरतील त्यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ मधील तरतुदीनूसार यथायोग्य प्रशासकीय कार्यवाही करावी / प्रस्तावित करावी व आपला अनुपालन अहवाल आयोगास हे आदेश प्राप्त झाल्यानंतर नव्वद दिवसाचे आत पाठवावा.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०५-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.मुदखेडकर महंमद, पिता मोहंमद युसूफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त,

मिलकार्नर, बसस्टॅण्डरोड, नांदेड.

२ जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा) तहसील कार्यालय, पुर्णा यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा तहसीलदार, पुर्णा, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ जिल्हाधिकारी, परभणी यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२३६

निर्णय दिनांक ०५-०७-२००७

श्री. गुट्टे जनार्धन बापुराव (सह शिक्षक), : अपीलार्थी
राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर,
तालुका किनवट जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी माध्यमिक
विद्यालय, निचपूर, तालुका किनवट
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद, नांदेड

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. गुट्टे जनार्धन बापुराव (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका किनवट जिल्हा नांदेड हे गैरहजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड श्री. आनंदराव सखाराम वाधे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०५-२००६ रोजी केलेले व्दितीय अपील त्याच बरोबर जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या माहितीसाठी च्या दिनांक २१-१०-२००५ च्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता अपीलार्थीने संबंधित शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापकाकडे वार्षिक वेतनवाढ न मंजूर करणे, सेवा पुस्तक भरुन न देणे, जानेवारी २००६ पासूनचे वेतन न मिळाले बाबत अर्ज केल्याचे दिसते. अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या अर्जाचे अवलोकन करता अपीलार्थीस नेमके कोणती माहिती जन माहिती अधिका-याकडून अपेक्षित आहे हे स्पष्ट होत नाही परंतु अपीलार्थीस त्यांची देय वेतनवाढ मिळाली नसल्याचे, जानेवारी २००६ पासून मासिक देय वेतन प्राप्त झाले नसल्याचे दिसून येते.

अपीलार्थीने वेळोवेळी प्रयत्न करुन देखील अपीलार्थीस या संदर्भातील माहिती मिळण्यामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रतिबंध झाला असल्याचे दिसून येते.

अपीलार्थीने या विषयावर विचारलेल्या माहितीचे टपाल जन माहिती अधिकारी स्विकृत करत नाही असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे. त्यांच्या म्हणण्यापृष्ठ्यर्थ त्यांनी आज आयोगा समोर संबंधित मुख्याध्यापकांना लिहिलेली पत्रे दिनांक २१-१०-२००५, २२-०३-२००६ रोजी परत आलेले आहे ती त्यांनी आज आयोगासमोर दाखविली.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) (a)(b)(c) या तरतुदींची पुर्तता या प्रकरणी होत असल्याने अपीलार्थीचा सदर अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल करुन घेण्यात येत आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जन अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड हे हजर आहेत. या प्रकरणात त्यांनी काय कारवाई केली असे त्यांना विचारले असता त्यांनी त्यांचे कडील दिनांक १२ एप्रिल २००६ रोजीचे अपीलार्थी यांना उद्देशून लिहिलेले पत्र दाखविले. या पत्रामध्ये त्यांनी अपीलार्थीस परत मुख्याध्यापक यांच्याकडे जाण्याचे सुचविले आहे व या पत्राची प्रत मुख्याध्यापक, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका किनवट जिल्हा नांदेड यांना देऊन अपीलार्थीची कामे तात्काळ करुन देण्यास त्यांना सुचित केले आहे.

अपीलार्थीला आजमितीला गेल्या सहा महिन्याचे वेतन प्राप्त झाले नाही असे अपीलार्थी ने सांगितले. अपीलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे जे अर्ज केले आहेत त्यासोबत त्यांनी या संस्थेच्या मुख्यायाध्यापक किंवा सचिवाविषयी लेखी तक्रार करुन या बाबी संबंधित शिक्षणाधिका-याच्या निदर्शनास आणल्या आहेत. अपीलार्थीचे गा-हाणे दूर करण्याच्या दृष्टीने जन अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही ठोस कारवाई केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही. तेव्हा असे आदेशित करण्यात येते की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करुन हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सर्व संबंधित शिक्षकांचे वेतन, वेतनातील फरक, आणि त्यांना इतर देय

असलेले फायदे अपीलार्थीस प्रत्यक्षपणे मिळतील याची खात्री करुन घ्यावी. त्याचबरोबर सदर संस्थेच्या जन माहिती अधिका-यावर महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली १९८१ नुसार, योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन त्याचा अहवाल आयोगास दोन महिन्याचे आत पाठवावा.

जर सदर शिक्षण संस्थेने अपीलार्थीचे वेतन, याऊपरही दिले नाही तर सदर शिक्षण संस्थेची मान्यता काढून घेण्यासंदर्भात तसेच अनुदान स्थगित ठेवण्यासंदर्भात शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी चौकशीअंती योग्य ती कार्यवाही करावी असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करुन हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सर्व संबंधित शिक्षकांचे वेतन, वेतनातील फरक, आणि त्यांना इतर देय असलेले फायदे अपीलार्थीस प्रत्यक्ष पणे मिळतील याची खात्री करुन घ्यावी.

३. सदर संस्थेच्या जन माहिती अधिका-यावर महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती नियमावली १९८१ नुसार योग्य ती प्रशासकीय कारवाई करुन त्याचा अहवाल आयोगास सदर आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याचे आत पाठवावा.

४. सदर शिक्षण संस्थेने अपीलार्थीचे वेतन, जर याऊपरही दिले नाही तर सदर शिक्षण संस्थेची मान्यता काढून घेण्यासंदर्भात तसेच अनुदान स्थगित ठेवण्यासंदर्भात

शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नांदेड यांनी योग्य ती कार्यवाही करुन आपला अनुपालन अहवाल आयोगास पाठवावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गुट्टे जनार्धन बापुराव (सह शिक्षक), राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका किनवट जिल्हा नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, निचपूर, तालुका किनवट जिल्हा नांदेडयांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ २४०/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०६-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रशांत पोपशेटवार,<br>गांधी चौक, भोकर जिल्हा- नांदेड. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>तालुका भुमीअभिलेख अधिकारी,<br>भोकर, जिल्हा- नांदेड. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा<br>जिल्हा भुमीअभिलेख अधिकारी,<br>कार्यालय, नांदेड. | .. | |

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री.प्रशांत पोपशेटवार,( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ), जनमाहिती अधिकारी तथा तालूका भुमीअभिलेख अधिकारी, भोकर, श्री.जी.बी.अभमवार, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा जिल्हा भुमीअभिलेख अधिकारी, नांदेड, यांचे प्रतिनिधी, श्री.जी.जी.गोटवार ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

अपिलार्थीने या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती मिळविण्यासाठी दोन वेगवेगळे अर्ज खालील प्रमाणे दाखल केले आहेत.

अ) या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांची नावे, कार्यालयीन पदभार तसेच जनमाहिती अधिकारी यांच्या सह त्यांच्या कार्यालयातील सर्वजण मुख्यालयात राहत असतील तर त्यांचे घरभाडेपट्टी पावती, असे संबंधीत लागणा-या कागदपत्राची तपशीलवार यादी ही माहिती - मागविली होती.

अपिलार्थीने ही माहिती शिघ्र टपालाव्दारे मागीतली आहे.

ब) याच अर्जाबरोबर अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या दिनांक- २९-११-२००५ या तारखेस केलेल्या दुस-या माहितीचा अर्ज जोडला आहे. या अर्जामध्ये स. न. २६-५-१९९० गट नं. ३३ याचा मोजणी नकाशा मिळण्या बाबत व संबंधीत फाईल नंबर १५४५/९० गट नंबर- ३३ किनवट रोड भोकर ही माहिती मागविली आहे.

अपिलार्थीने ही माहिती शिघ्र टपालाव्दारे मागीतली आहे.

अपिलार्थीच्या या दोन माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जातील माहिती संदर्भात त्यांनी दिनांक- ०६-०५-२००६ रोजी पत्र देवून त्या पत्रामध्ये एकूण १५ कर्मचा-यांपैकी १३ कर्मचा-यांचे पत्ते अपिलार्थीस पुरविले आहेत. यापैकी ज्या दोन कर्मचा-यांचे पत्ते पुरविले नाहीत ते अपिलार्थीस माहिती पुरविण्याच्या वेळी नुकतेच हजर झाले असल्यामूळे त्यांचे पत्ते जनमाहिती अधिकारी हे अपिलार्थीस देवू शकले

नाहीत. अपिलार्थीस ही माहिती देवून आता सुमारे एक वर्षाहून जास्त कालावधी लोटला आहे. किमान हया वर्षभरात तरी अपिलार्थीस हे पत्ते कळविले की नाही असा प्रश्न जनमाहिती अधिकारी यांना विचारला असता त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

अपिलार्थीस दिनांक- २९-११-२००५ च्या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीस ही माहिती पोंहचल्याचे जनमाहिती अधिकारी आज सुनावणीमध्ये खात्रीपूर्वक सांगू शकत नाही. त्यांच्याकडे अपिलार्थीस माहिती मिळाल्याबद्दल अपिलार्थीची पोंच पावती उपलब्ध नाही.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून एका प्रकरणात अपूर्ण माहिती मिळाली तर दुस-या प्रकरणात काहीही माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने त्याचे दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जा संदर्भात दिनांक- १२-०६-२००६ रोजी तर दिनांक- २९-११-२००५ रोजीच्या संदर्भात दिनांक- ०३-०५-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. या दोन्हीही प्रकरणात जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र क्रमांक- १५९५ व १५९६ दिनांक- १६-०६-२००६ अन्वये “ आपल्या संदर्भीय अपीलअर्जाची छाननी केली असता, अर्जासोबत पुरवावयाची कागदपत्रे दिसून येत नाही. तरी आपला संदर्भीय अपीलअर्ज निकाली काढण्यात आला आहे,” असे कळविले. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दोन्हीही अर्जावर एक सारख्या दिलेल्या या उत्तराने अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०७-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. यामध्ये त्यांनी जनअपिलीय अधिकारी यांनी दिशाभुल करणारी व हेतूपुरस्सर चुकीचा निर्णय

दिल्याचे नमूद केले व त्याचबरोबर संबंधित अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी अन्वये शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अपिलार्थीच्या दोन्हीही अर्जावर युक्तीवाद करण्यात आला. अपिलार्थीच्या दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जावर जरी जनमाहिती अधिकारी यांनी विहित वेळेत प्रतिसाद दिलयाचे त्यांनी उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत असले तरी सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली किंवा नाही, यांची त्यांना आजमितीस खात्री नाही. जनमाहिती अधिकारी यांनी हे पत्र साध्या पोष्टाने पाठविले होते व या पृष्ठयर्थ अपिलार्थीची कोणतीही पोंचपावती त्यांच्याकडे उपलब्ध नाही. त्याचबरोबर त्यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांच्या कार्यालयातील एकूण १५ कर्मचा-यांपैकी त्यांनी १३ कर्मचा-यांच्या पत्यांची माहिती अपिलार्थीस दिल्याचे दिसते. उर्वरीत दोन कर्मचारी अपिलार्थीने माहिती मागविण्याच्या वेळेस सेवेत नुकतेच रुजू झाले असल्याने त्यांचे पत्ते अपिलार्थीस त्यावेळी जनमाहिती अधिकारी यांनी पुरविले नाही. हा जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे मांडण्यात आलेला युक्तीवाद ग्राहय धरला तरी उर्वरीत दोन कर्मचा-याचे पत्ते त्यांनी नजीकच्या काळातच अपिलार्थीस का पुरविले नाही, या प्रश्नावर जनमाहिती अधिकारी यांचेकडे उत्तर नाही, अपिलाथीच्या मूळ अर्जा नंतर आजमितीस एक वर्षाहून जास्त कालावधी लोटल्या नंतरही दोन कर्मचा-यांचे पत्ते त्यांनी अपिलार्थीस पुरविले नाही. यावरुन अपिलार्थीने मागितलेली संपूर्ण माहिती, त्यांना देण्यामध्ये जनमाहिती अधिका-यास फारसे स्वारस्य नव्हते, हे सिध्द होते. याच अर्जामध्ये अपिलार्थीने संबंधित कर्मचा-याच्या भाडेपावतीची मागणी केली आहे. अपिलार्थीच्या या मागणी संबंधात देखील जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस

पुरविलेल्या पत्रामध्ये कोणतेही भाष्य नाही. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती पुरविल्याचे सिध्द होत आहे.

अपिलार्थीने केलेल्या त्यांच्या दिनांक- २९-११-२००५ रोजीच्या दुस-या विषयावरील अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत काहीच कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या दिनांक- २९-११-२००५ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती व संबंधित नस्ती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे आज रोजी उपलब्ध नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थी कडून प्राप्त झालेला अर्ज ही नस्ती ज्या जनमाहिती अधिका-यांकडे उपलब्ध आहे. त्यांच्याकडे पाच दिवसाच्या आत पाठवावयास हवी होती. तथापि त्यांनीही या प्रकरणी काहीच कार्यवाही केली नसल्याचे दिसून येते. त्यांनी याही प्रकरणी त्यांच्या अपिलार्थीस दिलेल्या या थंड प्रतिसादातील त्यांचा अभाव व अकार्यक्षमता सिध्द केली आहे. याची आयुक्त, जमाबंदी, पुणे यांनी यथायोग्य रित्या नोंद घ्यावी.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आज दोन्हीही प्रकरणी काहीही माहिती न मिळाल्यामूळे अपीलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत अपील केले. यापैकी त्यांनी त्यांचे दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये केलेले अपील विहित मुदतीत केल्याचे दिसते.

तथापि त्यांचे दिनांक- २९-११-२००५ रोजीच्या अर्जा संदर्भात त्यांनी मुळात प्रथम अपील दिनांक- ०३-०५-२००६ रोजी म्हणजेच अंदाजे चार महिने इतक्या विलंबाने केलेले आहे. त्यामूळे हे अपील कालबाहय ठरत आहे.

या प्रकरणामध्ये जनअपिलीय यांची  अपिलार्थीचे अपील हाताळण्याची पध्दती पहाता त्यांनी त्यांचे कर्तव्य जबाबदारपूर्वक पार न पाडता त्यांच्यामध्ये असलेली बेपर्वाइ व अकार्यक्षमता त्यांच्या या कृतीव्दारे सिध्द केली आहे. त्यांच्या हया कार्यपध्दतीची नोंद आयुक्त जमाबंदी, पुणे यांनी यथायोग्य रित्या घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, संबंधीत अपिलार्थी यांना माहिती प्राप्त  करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य नसून अपिलार्थी हे केवळ कार्यालयाला त्रास देण्याच्या उद्देशाने वारंवार माहितीची मागणी करत असतात. जनमाहिती अधिकारी यांच्या या युक्तीवादावर, माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये अपिलार्थीच्या हेतु संदर्भात कोणत्याही प्रकारची तरतुद नसल्याने जनमाहिती अधिकारी यांचा हा मुद्दा येथे विचारात घेता येत नाही.

वरील प्रमाणे झालेला युक्तिवाद लक्षात घेता असे आदेशित करण्यात येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक- ०२-०५-२००६ रोजीच्या अर्जावर अपूर्ण  माहिती दिली आहे. त्यांनी ती माहिती आता पूर्ण करुन अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत विनामुल्य पुरवावी व माहिती मिळाल्या प्रीत्यर्थ अपिलार्थीची पोंचपावती घ्यावी.

वरील विवेंचनासह अपिलार्थीचे हे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

# निर्णय

६. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

७. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, हे आदेश प्राप्त झाल्यानंतर तीन दिवसाच्या आत अपिलार्थीच्या दिनांक- ०२-०५-२००६ च्या अर्जाव्दारे त्यांनी मागितलेली सर्व माहिती विनामुल्य पुरवावी व माहिती मिळाल्या प्रित्यर्थ अपिलार्थीची त्याबद्दल पोंचपावती घ्यावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०६-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.प्रशांत पोपशेटवार, मु.पो.ता.भोकर, जिल्हा- नांदेड

२ जनमाहिती अधिकारी तथा तालूका भुमीअभिलेख अधिकारी, भोकर, जिल्हा- नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा जिल्हा भुमीअभिलेख अधिकारी, नांदेड, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ संचालक, भुमीअभिलेख कार्यालय, पुणे यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम**

## २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२४४

निर्णय दिनांक ०६-०७-२००७

श्री. मनोज चंद्रकांत वाले, : अपीलार्थी
महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ०६,
मंदाडे हॉस्पिटल जवळ, बार्शी रोड, लातूर
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक
विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर
जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, लातूर जिल्हा लातूर

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. मनोज चंद्रकांत वाले लातूर हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर जिल्हा लातूर श्री. बालाजी मारोतराव मुंडे (यापुढे त्यांना

जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद,लातूर जिल्हा लातूर श्री. जे. डी. सांळूंखे (यापुढे त्यांना जन अपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत.

आजच्या सुनावणीच्या वेळी प्रथमच अपीलार्थी यांनी दिनांक २१-०६-२००७ रोजी केलेले त्यांचे शपथपत्र आयोगासमोर सादर केले गेले आहे. या शपथपत्रामध्ये त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले प्रकरण मागे घेत असल्याचे म्हटले आहे व त्याच बरोबर त्यांनी जन माहिती अधिकारी यांना मागितलेल्या माहितीची त्यांना सध्या आवश्यकता नाही व सदर प्रकरण बंद करण्याची आयोगास विनंती केली आहे. अपीलार्थी यांनी स्वतःहून राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील बंद करण्याची आयोगास विनंती केली आहे व राज्य माहिती आयोग ती विनंती मान्य करत आहे.

एवढे जरी असले तरी अपीलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेल्या माहितीचे स्वरुप लक्षात घेता या संस्थेच्या कारभाराची चौकशी करणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. तेव्हा असे आदेशित करण्यात येत आहे की, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्याच्या आत संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर जिल्हा लातूर या शाळेची माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार चौकशी करावी व कारभारात काही उणीवा आढळल्यास संबंधितावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी / प्रस्तावित करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद लातूर यांनी हे आदेश निर्गमित झाल्या पासून दोन महिन्याच्या आत संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर जिल्हा लातूर या शाळेची, माध्यमिक शाळा संहितेमधील तरतुदीनुसार चौकशी करावी व कारभारात काही उणीवा आढळल्यास संबंधितावर योग्य ती प्रशासकीय कारवाई करावी / प्रस्तावित करावी व याबाबतचा आपला अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मनोज चंद्रकांत वाले, महाराष्ट्र हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. ०६, मंदाडे हॉस्पिटल जवळ, बार्शी रोड, लातूर जिल्हा लातूर

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, संस्कार वर्धिनी माध्यमिक विद्यालय, एम. आय. डी. सी. कॉर्नर, लातूर जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३४३/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०६-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दासरे लक्ष्मण गणपतराव,<br>टंगणे निवास, शिवनगर, लातूर.<br>जिल्हा-लातूर. | .. | अपिलार्थी. |

विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक)<br>जिल्हा परिषद, लातूर. | .. | प्रतिवादी |
| २. | जन अपिलिय अधिकारी तथा<br>शिक्षण उपसंचालक, लातूर. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची पुढील सुनावणी दिनांक-०६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. दासरे लक्ष्मण गणपतराव,( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ), जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर, श्री.जे.डी.साळुखे, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा

शिक्षण उपसंचालक, श्री.अ.ज.ठाकरे, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणाची प्रथम सुनावणी आज दिनांक ०६-०६-०७ रोजी औरंगाबाद येथे ठेवण्यात आली होती. तद्नंतर दुसरी सुनावणी दिनांक- ०६-०७-०७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात येत आहे. आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचा अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक- २८-११-२००५ रोजी प्राप्त झाल्याचे कबुल केले. प्रथम सुनावणीमध्ये हा अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाला नसल्याचे त्यांनी म्हटले होते. प्रथम सुनावणीच्या वेळी सुनावणी नेमकी कोणत्या अर्जावर आहे. हे जनमाहिती अधिकारी यांना माहिती नसल्याने त्यांनी प्रथम सुनावणीच्या वेळी त्याप्रमाणे विधान केले होते. असे त्यांनी त्यांच्या दोन वेळच्या विसंगत विधानासंदर्भात स्पष्टीकरण देताना प्रतिपादन केले. अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे जनमाहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ३५ पत्राचे संदर्भ देवून या पत्रावर जनमाहिती अधिकारी यांनी काय कार्यवाही केली आहे. याच्या माहितीच्या प्रती जनमाहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः मागितल्या आहेत.

आज झालेल्या युक्तिवादामध्ये असे दिसून आले आहे की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः जनमाहिती अधिकारी हयांचे दिनांक- २५-११-२००६ रोजीच्या अर्जान्वये काही माहिती मागवली होती. त्यास जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक- १३-१२-२००६ चे पत्रान्वये प्रथम प्रतिसाद दिला होता. तथापि अपिलार्थीने ही माहिती स्विकारण्यास नकार दिल्याने ही माहिती अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडील दिनांक- १७-०३-२००६ चे पत्रान्वये पोस्टाने पाठविली ती अपिलार्थीस मिळाल्याचे अपिलार्थी आज कबूल करित आहेत.

तथापि जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्रतिसाद प्राप्त होण्यापूर्वीच अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- २३-१२-२००५ रोजी प्रथम अपिल केले आहे. या अपिलावर जनमाहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे दिसून येत नाही.

त्यामुळे व्यथित होवून अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १४-०२-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे व त्यामध्ये आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

दिनांक- १७-०३-२००६ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेली माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थी यांनी आज सुनावणीमध्ये कबुल केले आहे. तथापि त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना फक्त दोन मुद्यावरीलच माहिती प्राप्त झाली आहे. यावर जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा विचारला असता, त्यांनी अपिलार्थीस आठ मुद्यावर माहिती दिल्याचे पत्र दाखविले व आठही मुद्यावर झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस पुरविल्याचे आज ते सुनावणीमध्ये सांगत आहेत. या प्रकरणासंदर्भातील सर्व नस्त्या जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीच्या वेळी आणल्या असून सर्व नस्त्या अपिलार्थीस पुरविण्याची त्यांची तयारी आहे. त्यांच्या म्हणण्यानूसार अपिलार्थी हे अहिल्यादेवी कन्या प्रशाला लातूर या संस्थेमध्ये सेवक या पदावर पूर्वीपासूनच कार्यरत होते. संबंधीत संस्थेच्या अध्यक्षानी त्यांच्या पातळीवर त्यांची सेवक म्हणून नियुक्ती केली होती. सदर शाळेकरिता सेवक या वर्गाची चारच पदे मजूंर होती. तथापि शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांनी पाचव्या पदावर अपिलार्थी यांची नेमणूक केली होती. मंजूर नसलेल्या पदावर अपिलार्थी यांची नियुक्ती झाली होती. तद्‌नंतर अपिलार्थी यांच्या म्हणण्यानूसार त्यांना तोंडी सूचना देवून कामावरुन कमी करण्यात आले. अपिलार्थी यांच्या नेमणूकी बाबत सध्या सदर शिक्षण संस्थे विरुध्द अपिलार्थी

यांचा मा.उच्च न्यायालयामध्ये वाद चालू आहे. सदर प्रकरण आजमितीस न्यायप्रविष्ट आहे. जनमाहिती अधिकारी यांनी या सर्व बाबी आयोगासमोर २०/- रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प लावलेल्या पत्राव्दारे सादर केल्या आहेत. याच पत्रामध्ये त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीचा हेतु माहिती मिळविण्याचा नसून स्वतःची 'सेवक' या पदावर नेमणूक करुन घेण्यासाठी व त्यांचे कार्यालयावर एक प्रकारे दबाव टाकण्यासाठी ते माहितीच्या अधिकारात पुन्हः पुन्हाः हीच माहिती मागवित आहे. "मला ही कागदे घेवून काय करायची आहेत ? मला रुजू करुन घ्या" अशा प्रकारचे विधान अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांचे पुढे केल्याचे या पत्रामध्ये त्यांनी पुढे म्हटले आहे

वरील प्रमाणे दोन्ही बांजूचे म्हणणे ऐकून व अपिलार्थीस अपेक्षीत असलेली माहिती मिळण्याच्या दृष्टीने असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी हे जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीवर समाधानी झाले नसल्याने या प्रकरणातील सर्व नस्त्या अपिलार्थीने शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्या कार्यालयात जावून दिनांक १०-०७-२००७ रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून पहाव्यात व त्यांना आवश्यक असलेल्या अशा कागदपत्रांच्या प्रती त्या नस्तीतून प्राप्त करुन घ्याव्यात. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयातील संबंधीत कर्मचा-यानी त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

## **निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. या प्रकरणातील सर्व नस्त्या अपिलार्थीने शिक्षण उपसंचालक, लातूर यांच्या कार्यालयात जावून दिनांक १०-०७-२००७ रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून पहाव्यात व त्यांना आवश्यक असलेल्या अशा पत्रव्यवहाराच्या प्रती त्या नस्तीतून अपिलार्थीने प्राप्त करुन घ्याव्यात. अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शिक्षण उपसंचालक यांच्या कार्यालयातील संबंधीत कर्मचा-यानी त्यांना आवश्यक ते सहकार्य करावे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०६-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.दासरे लक्ष्मण गणपतराव, हेंगणे निवास, शिवनगर, लातूर. जिल्हा-लातूर.

२ जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३५४/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०६-०७-२००७.

१. दासरे लक्ष्मण गणपतराव, .. अपिलार्थी.
टंगणे निवास, शिवनगर, लातूर.

जिल्हा-लातूर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, लातूर.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
शिक्षण उपसंचालक, लातूर.

## **विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी दिनांक-०६-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. दासरे लक्ष्मण गणपतराव,( येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल ), जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर, श्री.जे.डी.साळुखे, (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, श्री.अ.ज.ठाकरे, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अपिलार्थीने त्यांच्याकडील दिनांक- १४-११-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

“ १) जा.क्र.जि.प.ला/ शि.मा/ कावि/१/ ४८९/०४, शिक्षण विभाग (मा.) जि.प.लातूर, दिनांक-११-१०-०४ याची एक प्रत मुख्याध्यापक

अहिल्यादेवी कन्या प्रशाला यांना देण्यात आलेला जावक क्रमांक व दिनांक.

२) वैयक्तिक मान्यता - श्री.कांबळे सोपान बाबूराव यांना वैयक्तिक मान्यता दिलेल्या सेवाजेष्ठता यादीची सत्यप्रत.

३) कांबळे सोपान बाबूराव यांना दिलेल्या वैयक्तिक मान्यता आदेशाची सत्यप्रत.

अपीलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षीली होती.

अपीलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक- २३-११-२००५ रोजी प्रथम प्रतिसाद दिला. अपिलार्थीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी, मुख्याध्यापक अहिल्यादेवी कन्या प्रशाला, लातूर जेथे अर्जदार सेवक म्हणून हया पदावर कार्यरत होते, त्यांना अपिलार्थी यांनी दिलेल्या दिनांक- १४-११-२००५ रोजीच्या अर्जातील मुद्दे कळवून या मुद्या संदर्भातील माहिती त्यांच्या कार्यालयात मागविली व या पत्राची प्रत अपिलार्थीस देवून अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी मुख्याध्यापक अहिल्यादेवी कन्या प्रशाला, लातूर यांच्याकडून परस्पर हस्तगत करुन घेण्याचे सुचविले. या पत्रात जनमाहिती अधिकारी यांनी मुख्याध्यापकास दिलेल्या या सूचनावर काय कार्यवाही झाली, हे जनमाहिती अधिकारी सांगू शकले नाहीत.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत कोणत्याही प्रकारची माहिती न मिळाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांचेकडील दिनांक- १४-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील केले आहे. सदर अपील अर्ज जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात दिनांक- १५-१२-२००५ रोजी प्राप्त झाला. सदर अपीलाची सुनावणी जनअपिलीय अधिकारी यांच्या कार्यालयात

दिनांक- ०६-०२-२००६ रोजी होवून जनअपिलीय अधिकारी यांनी आपला निर्णय दिनांक- २१-०२-२००६ रोजी पारीत केला. जनअपिलीय अधिकारी यांचा सदर अपील निर्णय पहाता, त्यांनी सर्व  उपस्थितांची बैठक घेवून त्यांचा इतिवृत्तांत काढला असल्याचे दिसून येते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस अपेक्षीत असलेली माहिती त्यांना दिनांक- १४-०२-२००६ रोजी देण्याचे ठरले असल्याचे दिसून येते.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जात सदर माहिती व्यक्तीशः अपेक्षीली असल्यामूळे जनमाहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने अपिलार्थीस समक्ष माहिती देण्याचा प्रयत्न केला. तथापि अपिलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिला असल्याचे राज्य माहिती आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. अपिलार्थीने माहिती घेण्यास नकार दिल्यानंतर लागलीच जनमाहिती अधिकारी यांनी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- १५-०२-२००६ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीने माहिती घेण्यास नकार दिल्याचे कळविले. जनमाहिती अधिकारी यांनी या पत्राची प्रत अपिलार्थीस अग्रेषित करुन सदर माहिती तयार असल्याचे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसून येते.

अपिलार्थी हे अर्ज करुनही व्यक्तीशः माहिती घेण्यासाठी कार्यालयात उपस्थित रहात नाही, असे पाहून जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील पत्र दिनांक- १७-०३-२००६  अन्वये सदर माहिती अपिलार्थीस पोष्टाने पाठवून दिली. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्याचे अपिलार्थीने आयोगास सादर केलेल्या माहितीवरुन दिसून येते.

अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून वेळेत माहिती प्राप्त न झाल्यामूळे व्यथीत होवून  अपिलार्थीने दिनांक- १४-०२-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या अपीलामध्ये त्यांनी कोणत्याही प्रकारची विशीष्ट मागणी केल्याचे दिसून येत नाही. तथापि या अपीलामध्ये शिक्षण उपसंचालक यांनी त्यांना कोणतीच माहिती दिली नाही, अशा अर्थाचा एक उल्लेख या अपीलामध्ये आढळतो. व्दितीय अपीलाचे अवलोकन करता अपिलार्थीस अपेक्षीत असलेली माहिती मिळाली नसल्यामूळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे मूळ अर्जातील माहितीसाठी व्दितीय अपील केले असे गृहीत धरुन ही सुनावणी पुढे घेण्यात येत आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद मांडला गेला की, त्यांनी अपिलार्थीस दिनांक- १७-०३-२००६ रोजी आवश्यक ती माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीचे अवलोकन करता अपिलार्थीने एकूण तीन मुद्यावर माहिती मागविली होती. त्यापैकी जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दोन मुद्यावर माहिती दिली. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक-१वर जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे. तथापि जनमाहिती अधिकारी यांनी या मुद्यावर अपिलार्थीस माहिती दिली आहे. असे आयोगास पुढे सांगितले. परंतू त्या पृष्टर्थ ते कोणताही पुरावा आयोगा समोर सादर करु शकले नाहीत.

तव्दतच त्यांचे म्हणणे असे आहे की, अपिलार्थीने मागितलेली माहिती ही मुलतः सर्वसाधारण परिस्थितीत संदर्भीत शिक्षण संस्थेच्या कार्यालयाकडेच असणे अपेक्षीत आहे. अपिलार्थीने सदर माहितीसाठी या शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापका कडे अर्ज करावयास हवा होता. परंतू तो त्यांनी चुकीच्या प्राधिकरणाकडे केला आहे. त्यामूळे अपिलार्थीस माहिती मिळविण्यासाठी विलंब झाला आहे. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक- २३-११-२००५ रोजीचे पत्र अपिलार्थी यांना उद्देशून पाठवावयास

हवे होते. तथापि त्यांनी तसे न करता सदर संस्थेच्या मुख्याध्यापकाना पाठवून त्यांच्याकडून सदर माहिती स्वतःचे कार्यालयास मिळविण्याचा प्रयत्न केला. ही जनमाहिती अधिकारी यांची कृती चुकीची आहे, असे त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीचा अर्ज, अपिलार्थीकडून तो प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त पाच दिवसाच्या आत सदर शिक्षण संस्थेच्या मुख्याध्यापकाकडे, जे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी आहेत, त्यांच्याकडे पाठवावयास हवा होता. येथून पुढे अशा प्रकारच्या चुकांची पुनरावृती करु नये, अशी त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.दोन्ही बांजूचे म्हणणे ऐकून असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक-१ च्या संदर्भातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक-१ च्या संदर्भातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यापासून सात दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०६-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.दासरे लक्ष्मण गणपतराव, हेंगणे निवास, शिवनगर, लातूर. जिल्हा-लातूर.

२ जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

५ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२२४

निर्णय दिनांक ०७-०७-२००७

डॉ. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, : अपीलार्थी
बालाजी मंदिर रोड, मोंढा, परतूर,
तालुका परतूर जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर,
तालुका परतूर जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त

कार्यालय, औरंगाबाद

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी डॉ. रामप्रसाद माधवलाल पोरवाल परतूर (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल), जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर जिल्हा जालना श्री. महेश वडदकर (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचे प्रतिनिधी रजा राखीव मुख्याधिकारी श्री. पी. ए. कुलकर्णी हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम त्यांच्याकडील दिनांक ११-०८-२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालील ३ मुद्दयावर माहिती मागितली होती.

१. “ दिनांक ३१-०८-२००० रोजी जिना बांधकाम परवानगी मिळण्याबाबत अर्ज करुनही अद्यापपर्यंत परवानगी का देण्यात आली नाही याचा खुलासा करणेबाबत माहिती मिळणेबाबत अर्ज सादर.

२. दिनांक १८-०७-१९८५ रोजी केशवराव कुलकर्णी यांचे नामांतर करणारे (१) मुख्याधिकारी (२) कारकून यांचे नांव व पत्ता मिळणे संबंधी माहिती अर्ज सादर.

३. घर नंबर १७४८, १७४९/१ रजिस्टर रिव्हीजन नक्कल.

अर्जदाराने माहिती “ नेहमीच्या सिरस्त्याप्रमाणे ” मागितली होती. ”

अपीलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद त्यांच्याकडील पत्र दिनांक ०७-०९-२००६ अन्वये देऊन वरील मुद्दा क्र. ३ ची माहिती दिली. अपीलार्थीने

मागितलेल्या माहिती संदर्भातील मुद्दा क्रमांक १ बाबत संचिका शोधण्याचे काम चालू आहे असे कळविले व मुद्दा क्रमांक २ च्या माहिती संदर्भात अपीलार्थीने मागितलेल्या व्यक्तीचे नाव व पत्ता याबाबतची माहिती अपीलार्थीस दिनांक १६-०९-२००६ पर्यत लेखी देण्याचे आश्वासित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक १५-०९-२००६ रोजी अपीलार्थीस बांधकाम परवानगीविषयक संचिका नगरपरिषदेच्या कार्यालयात आढळून येत नसल्याचे कळविले व अपीलार्थीने मूळ अर्जामध्ये मागितलेल्या व्यक्तींची नावे अपीलार्थीस कळविली. सदर व्यक्तींचे पत्ते नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याने या संदर्भातील माहिती अपीलार्थीस देऊ शकले नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थीने जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-१२-२००६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले. सदर अपीलाची अंतीम सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे कार्यालयात दिनांक २५-०१-२००७ रोजी घेऊन अपीलार्थीचे अपील मान्य केले व जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या मूळ अर्जात विनंती केल्याप्रमाणे त्यांनी मागितलेली सर्व माहिती ७ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सुचित केले. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिनांक ०९-०२-२००७ रोजी अपीलार्थीने मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती पुरविल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दिलेल्या पत्रावरुन दिसून येते. सदर माहिती अपीलार्थीस ०९-०२-२००७ रोजी मिळाल्याची अपीलार्थीची पोहोच पावती या पत्रावर आहे.

जन अपीलीय अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दिनांक १५-०२-२००७ रोजी राज्य माहिती आयोगा

कडे व्दितीय अपील केले. या अपीलामध्ये त्यांनी जन अपीलीय अधिकारी यांनी अपील मंजूर केले व माहिती देणेविषयी आदेशित करुनही अद्याप अपीलार्थीस माहिती मिळाली नाही असे म्हटले आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अपीलार्थीस दिनांक ०९-०२-२००७ रोजी त्यांच्या मूळ अर्जात मागणी केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपीलार्थीस दिलेली आहे. अपीलार्थीने मुलतः त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांचा खुलासा विचारल्याचे दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेली माहिती विहित मुदतीत देणे अपेक्षित आहे तथापि त्यांच्या कोणत्याही बाबतीमधील त्यांच्या कृतीसमनार्थ खुलासा संबंधितांना देणे अभिप्रेत नाही. या प्रकरणी अपीलार्थीने दिनांक ३१-०८-२००० रोजी जिना बांधकाम परवानगी नगरपरिषदेस मागितली होती तथापि ती, त्यांना ८ वर्षे लोटूनही अद्यापपर्यंत प्राप्त झालेली नाही तेव्हा सदर बांधकाम परवानगी का प्राप्त होत नाही याचे कारण जाणून घेण्यास अपीलार्थी उत्सुक आहेत. नगरपरिषदेस बांधकाम संदर्भात एकदा अर्ज केल्यानंतर जर ६० दिवसाच्या आत संबंधित प्राधिकरणाकडून या बांधकामाविषयी कोणतेही मंजूरी वा नामंजूरीचे पत्र प्राप्त न झाल्यास बांधकामाची परवानगी मिळाली असे गृहीत धरुन बांधकाम करण्याचे अधिकार संबंधितांना आहे. या नियमाच्या आधारे अपीलार्थी यांनी बांधकाम का केले नाही असे विचारले असता त्यांनी सदर तरतुदींची त्यांना पुर्णपणे कल्पना आहे परंतु नगरपरिषदेच्या कर्मचा-यांनी त्यांचे बांधकाम सुरु करत असतांना त्यामध्ये अडथळे आणले असे सांगितले. आता नगरपरिषदेचे या संदर्भात म्हणणे आहे की सदर जागेवर मालकी हक्कासंदर्भात अपीलार्थी आणि त्यांचे शेजारी केशव कुलकर्णी यांच्यामध्ये दिवाणी न्यायालयामध्ये खटला चालू असल्यामुळे नगरपरिषदेने त्यांना परवानगी दिली नाही. यावर सदर दावा अपिलार्थी यांनी दाखल केला असून या दाव्याचा संदर्भीय बांधकाम परवानगीशी काहीही संबंध नाही

असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. केवळ अपिलार्थीस कोणत्या ना कोणत्या कारणास्तव परवानगी नाकारायची म्हणून नगरपरिषदेचे कर्मचा-यांनी हे कारण शोधून काढले आहे असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. वास्तविकतः नगरपरिषदेने अपीलार्थीचा अर्ज आल्यानंतर तात्काळ अपीलार्थीस बांधकामास परवानगी देता येते किंवा नाही या संदर्भात नगरपरिषदेने अपीलार्थीस ठोस उत्तर देणे अपेक्षित होते तथापि नगरपरिषदेकडून ठोस प्रकारची कोणतीही कारवाई झाल्याचे दिसून येत नाही.

अपीलार्थीने केलेल्या मूळ अर्जासंदर्भातील संचिका नगरपरिषदेकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलार्थीने त्यांच्या अर्जाव्दारे मागितलेल्या एकूण ३ मुद्यावरील माहितीपैकी २ मुद्यावरील माहिती अपीलार्थीस दिनांक ०९-०२-२००७ रोजी मिळाली आहे. अपीलार्थीने त्यांच्याकडे त्यांनी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे खुलासा विचारला तो खुलासा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जरी जन माहिती अधिकारी यांनी देणे अभिप्रेत नसले तरीही अपीलार्थीने या जिना बांधकामाविषयी त्यांच्याकडे मंजुरीसाठी फेरअर्ज करावा व सदर अर्जाची प्रचलीत नियमाप्रमाणे तपासणी करुन या प्रकरणी मुख्याधिकारी नगरपरिषद परतूर यांनी वेळीच यथायोग्य कार्यवाही करावी असे त्यांना सुचित करण्यात येत आहे.

अपीलार्थी यांना या प्रकरणात बराच त्रास झाल्याची त्यांनी आयोगासमोर कैफियत मांडली. अपीलार्थीने त्यांचा प्रथम अर्ज दिनांक ११-०८-२००६ रोजी केला त्यांना अपेक्षित असलेली माहिती दिनांक १०-०९-२००६ रोजी अगर तत्पुर्वी देणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अभिप्रेत आहे. तथापि अपीलार्थीस दिनांक १५-०९-२००६ रोजी प्रथम माहिती देण्यात आली व तीही अर्धवट स्वरुपात. या प्रकरणी माहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या या हलगर्जीपणाबाबत त्यांना ताकीद देण्यात येत आहे याची यथायोग्य नोंद आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन, संचालनालय, मुंबई यांनी घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

**निर्णय**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी परतूर नगर परिषद यांनी या प्रकरणी दाखविलेल्या हलगर्जीपणाबाबत त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०७ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ डॉ. रामप्रसाद माधवलाल पोरवाल, बालाजी मंदिर रोड, मोंढा, परतूर, तालुका परतूर जिल्हा जालना

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, परतूर, तालुका परतूर जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा. प्र.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन, संचालनालय, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/ ३५०/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०७-०७-२००७.

१. श्री. पाटील सोमेश चंद्रशेखर .. अपिलार्थी.
मु.पो.तपसे चिंचोली,
तालूका- औसा, जिल्हा- लातूर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, औसा,
जिल्हा- लातूर.

२. जन अपिलिय अधिकारी तथा ..
शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हापरिषद,
लातूर.

**<u>विवेचन</u>**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक-०७-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी,श्री. पाटील सोमेश चंद्रशेखर,( येथून पुढे

त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल),जनमाहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती, औसा, जिल्हा- लातूर,श्री.जी.डी.कळसे (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हापरिषद, लातूर, श्री.आर.बी.लगड, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक-०६-०९-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे "शैक्षणीक वर्ष २००४- २००५ व २००५-२००६ या कालावधीतील सर्वशिक्षा अभियाना संदर्भात एकूण १६ मुद्यांवर माहिती मागविली होती व दुस-या एका मुद्यांवर श्री.आलमले एस.डी. जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांची गट शिक्षण अधिकारी यांच्याशी असलेले गटसाधन केंद्राचे संयुक्त खाते, बदलण्याची कोणती कारणे या संदर्भातील मुद्यावर माहिती मागविली होती. अपिलार्थीने वरील प्रमाणे एकूण १७ मुद्यावर माहिती मागविली होती." या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वरील १७ मुद्या पैकी १२ मुद्यावर अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली आहे.
अपिलार्थीने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती.

याच प्रकरणाची प्रथम सुनावणी दिनांक- ०७-०६-२००७ रोजी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी व जनअपिलीय अधिकारी हे गैरहजर असल्यामूळे, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी पुढील तारीख देण्या बाबतची विनंती केल्यामूळे सदर सुनावणी पुढे ढकळून ती दिनांक- ०७-०७-०७ रोजी ठेवण्यात आली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास दिनांक- ०७-०६-०७ रोजी त्यांचे असे म्हणणे सादर केले की, अपिलार्थीने मागितलेली माहिती जनअपिलीय अधिकारी यांच्या समक्ष त्यांना देण्यात आली आहे. तथापि सदर माहिती अपिलार्थीस खरोखरच मिळाली किंवा कशी, हे कळण्यास मार्ग नसल्यामूळे व जनअपिलीय अधिकारी हे प्रथम सुनावणीच्या दिवशी हजर न राहू शकल्यामूळे ही सुनावणी दिनांक- ०७-०७-०७ रोजी ठेवण्यात आली होती.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- ०६-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती दिनांक-१२१०-२००६ रोजी रजिष्टरपोष्टाने अपिलार्थीस पाठविली होती. तथापि अपिलार्थी जागेवर उपलब्ध नसल्यामूळे सदरचे पाकीट जनमाहिती अधिकारी यांच्याकडे परत आले. तद्नंतर दिनांक- ११-१२-२००६ रोजी अपिलार्थीस ही माहिती जनमाहिती अधिकारी यांनी व्यक्तीशः दिलेली आहे व ही माहिती मिळाल्याचे अपिलार्थी आज आयोगा समोर कबुल करीत आहे.

याचबरोबर आता माहिती मिळाली असल्यामूळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले दिनांक- १७-०२-२००७ रोजीचे व्दितीय अपील मागे घेत असल्याचे शपथपत्रा व्दारे विनंती केली आहे.

अपिलार्थीने वरीलप्रमाणे केलेली विनंती मान्य करण्यात येत असून अपिलार्थीचे हे अपील खारीज करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## <u>निर्णय</u>

८. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०७-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.पाटील सोमेश चंद्रशेखर,मु.पो. तपसे चिंचोली, तालूका-औसा, जिल्हा- लातूर

२ जनमाहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, औसा, जिल्हा- लातूर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हापरिषद, लातूर यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

५ सचिव मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई - ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३८८/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०९-०७-२००७.

१. श्री.नरसिंग लक्ष्मण गड्डम (मयत) .. अपिलार्थी.
दातरंग मेळा, अहमदनगर.

विरुध्द

१. सचिव, .. प्रतिवादी
कृषी उत्पन्न बाजार समिती,
अहमदनगर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, अहमदनगर.

## विवेचन

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०९-०७-२००७ रोजी अहमनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिकारी यांचे वतीने ॲड. भिमराव सखाराम काकड हे हजर होते तर अपिलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, अहमदनगर श्री.डी.डी.शिंदे (येथून पुढे त्यांना जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल), हे हजर होते. सुनावणीच्या वेळी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहमदनगर यांचे वतीने ॲड. भिमराव सखाराम काकड हे हजर आहेत. अपिलाच्या सुनावणीच्या सुरुवातीसच जनमाहिती अधिकारी यांच्या वकीलाने सांगितले की, अपिलार्थी श्री. नरसिंग लक्ष्मण गड्डम हे मयत झाले असून त्यापृष्ठ्यर्थ महानगरपालिका, अहमदनगरचे मत्यू प्रमाणपत्र क्रमांक- ४४५, दिनांक- ३०-०६-२००७ आयोगास सादर केले आहे. या अपिलातील अपिलार्थी आता मयत झाले असल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे

केलेले व्दितीय अपील खारीज करण्यात येत आहे. सबब खालीलप्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

**अहमदनगर.** **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०९-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ जनमाहिती अधिकारी तथा सचिव, कृषी उत्पन्न बाजार समिती, अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

२ जनअपीलय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदगनर ,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ मुख्य सचिव, महाराष्ट्र-राज्य मंत्रालय, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात येते.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/३९७/रामाआ/औ’बाद
निर्णय दिनांक ०९-०७-२००७.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.पांडूरंग विठ्ठल कोल्हे,<br>मु.पो.लोणी हवेली, तालूका-पारनेर<br>जिल्हा- अहमदनगर. | .. | अपिलार्थी. |
| | विरुध्द | | |
| १. | जनमाहिती अधिकारी तथा<br>कक्ष अधिकारी, (सा.प्र.वि.)<br>जिल्हा परिषद, अहमदनगर. | .. | प्रतिवादी |
| २. | जनअपिलिय अधिकारी तथा<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी<br>(सा.प्र.वि.)जिल्हापरिषद, अहदमनगर. | .. | |

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०९-०७-२००७ रोजी अहमनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी , श्री.पांडुरंग विठ्ठल कोल्हे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.), जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) जिल्हापरिषद, अहमदनगर, श्री.गोविंद आडम, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) व जन अपिलिय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी ( सा.प्र.वि. ) जिल्हापरिषद, अहमदनगर, श्री. जयवंत पाडवी ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचेकडील दिनांक- १६-०२-२००६ रोजीच्या अर्जामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" माझे वडील शिक्षक असतांना ते २२-१-७७ मयत झाले. मी सज्ञान झालेवर ३१-२-१९८५ रोजी अनुकंपा तत्वावरील नोकरीसाठी अर्ज केला. माझी सवलत नाकारली. शासन साप्रवि/ निर्णय क्र. दि. २६/१०/९४ नुसार अनुकंपा हा हक्क नसून सवलत आहे कळविले. मग या सवलती प्रमाणे आपण १९८५ पासून ज्यांना ४ थ्या श्रेणीत नोक-या दिलेल्या त्यांची यादी पाहिजे."

अपिलाथीने सदर माहिती अतिशिघ्र टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम दिनाक- २८-०३-२००६ रोजी, अपिलार्थीने ७५ रुपये इतक्या रक्कमेचा शासकीय तिजोरीत भरणा करणे बाबत सूचित केले. या सूचनेप्रमाणे अपिलार्थी यांनी दिनांक- ०४-०४-०६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संपूर्ण रक्कमेचा भरणा केला. अपिलार्थी यांच्याकडून सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दिनांक- ०७-०४-०६ रोजीच्या पत्रामध्ये अपिलार्थीस ही माहिती पुरविली आहे. तथापि जनमाहिती अधिकारी यांच्याकडील या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम (१९) (१) अन्वये दिनांक- १०-०३-०६ रोजी प्रथम अपील केले. तो अपील अर्ज त्यांच्याकडे दिनांक- १३-०३-२००६ रोजी प्राप्त झाला.

या अपीलअर्जामध्ये जनमाहिती  अधिकारी यांनी आठ दिवसात प्रयत्न करुनही माहितीचा अर्ज नाकारला, असे म्हटले आहे.

या अपीलअर्जावर अपिलार्थीने कोणतीही विशीष्ट माहितीची मागणी केल्याचे दिसून येत नाही. अपिलार्थीच्या या अपीलअर्जावर जनअपिलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे सुनावणी घेतल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

जनअपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेतल्याने व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २८-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिली. त्यांनी अपिलार्थीस याद्या दिल्याचे ते आयोगाकडे व्दितीय अपीलामध्ये मान्य करीत आहेत परंतू सदर माहितीमध्ये या नेमणूका कोणत्या कारणास्तव झाल्या नियुक्तीची तारीख व नियुक्ती झालेलया कर्मचा-याची माहिती जनमाहिती अधिकारी यांन दडवली आहे, असे त्यांचे म्हणणे आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीची  तपासणी केली असता, असे दिसून येते की, अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या प्रथम अपील अर्जामध्ये वर्ग-४ च्या नियुक्त्या केलेल्या पैकी कर्मचा-यांची यादी मागविली होती.  त्यामध्ये व आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपीलामध्ये कोणत्याही प्रकारच्या विशिष्ट मुद्याचा उल्लेख करण्यात आलेला नव्हता. आयोगाच्या मते जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०४-२००६ रोजी दिलेली

माहिती ही अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अजाने विचारलेली माहिती आहे. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अपीलामध्ये जे जादाचे मुद्दे उपस्थित केले आहे. त्या मुद्यावर मुळातच अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे माहिती मागविली नसल्यामूळे त्यांना ती जनमाहिती अधिकारी यांनी स्वतःहून पुरविणे अपेक्षित नाही. प्रथम अर्जातील मुद्यांवरच प्रथम व व्दितीय अपिले करणे हे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीशी जास्त संयुक्तिक आहे. सबब अपिलार्थीचे अपील वरीलप्रमाणे जरी फेटाळण्यात आले असलेतरी या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक- १६-०२-२००६ रोजीच्या अर्जास मुळात जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम प्रतिसाद दिनांक- २८-०३-२००६ रोजी म्हणजेच अपिलार्थीच्या मूळ माहिती अर्जास, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या विहित तरतुदी नंतर उत्तर दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या अशा प्रकारच्या विलंबा बाबत त्यांना आयोगातर्फे ताकीद देण्यात येत आहे.  सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

२. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अहमदनगर.**
दिनांक ०९-०७-२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.पांडुरंग विठ्ठल कोल्हे, मु.पो.लोणी हवेली, तालूका- पारनेर, जिल्हा-अहमदनगर

२ जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.), जिल्हापरिषद अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपीलय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) जिल्हापरिषद, अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/३९८/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०९-०७-२००७.

१. श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे .. अपिलार्थी.
रा.१२८, आर्शिवाद स्टेट बँक कॉलनी
मालदाड रोड, संगमनेर,
जिल्हा- अहमदनगर

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
उप अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उभारणी तथा संचलन व सुव्यवस्था विभाग, संगमनेर.
जिल्हा- अहमदनगर.

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..

कार्यकारी अभियेंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी
मर्यादित, उभारणी तथा संचलन व
सुव्यवस्था विभाग, संगमनेर.
जि- अहमदनगर.

## **विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०९-०७-२००७ रोजी अहमदगनर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, श्री.राजेश चंद्रकांत वाकचौरे, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, संगमनेर, श्री.एन.डी.जालोरी, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जनअपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.म.संगमनेर ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम त्यांचेकडील दिनांक- १३-१२-२००५ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील माहिती मिळण्या संदर्भात अर्ज केला होता.

" माझा ग्राहक क्रमांक १५५०४०१३१९०८१ आय नंबर ८०८३१३ ग्राहक क्रमांका नुसार मला खालील प्रमाणे माहिती मिळावी.

१) वीज बीलाचा खाते उतारा दिनांक- १-०५-२९९५ ते १३-१२-२००५ या कालावधीचा खालीलप्रमाणे मिळावा.

१. इतर आकार या रकान्यात जमा केलेली रक्कम.

२. सुरक्षा ठेव जमा

३. समायोजन

४. आजपर्यंत वीज बील / आकार सोडून भरलेले व्याज.

२) दिनांक- २४-११-२००५ रोजी दिलेल्या विनंती अर्जाचा दैनंदीन अहवाल मिळावा व त्या अर्जावर आपण दिनांक- १३-१२-२००५ पर्यंत काय कार्यवाही केली त्याचा तपशील मिळावा.

३) २००२ ते २००३, २००३-२००४, २००४-२००५ या आर्थीक वर्षात आपण केलेल्या भारनियमनाचे वेळापत्रक व त्यानुसार केलेल्या भारनियमाचा तपशील मिळावा."

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- २०-१२-२००६ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद दिला. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेली माहिती अपूर्ण आहे असे वाटल्यावरुन अपिलार्थीने त्यांच्याकडे दिनांक- २२-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले.

या पत्राचे अवलोकन करता अपिलार्थीने मागितलेले भारनियमाचे वेळापत्रका संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वेगळ्या शासकीय प्राधिकरणाकडे जाण्याचे सूचीत केले असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर या पत्रामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे घरी संर्पक साधला होता, असे म्हटले आहे. अपिलार्थीने ही माहिती पोष्टाने मागितली असतांना देखील अपिलार्थीचे घरी संपर्क साधण्याची काय आवश्यकता होती, हे कळण्यास त्यावेळचे जनमाहिती अधिकारी आज उपस्थित नाहीत ते आता बदलून गेले आहेत.

या अपिलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची जनअपिलीय अधिकारी यांना विनंती करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे. या अपीलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नसल्याचे आयोगासमोर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते व सुनावणी झाली नाही, ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर मान्य केली आहे. जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून वरीलप्रमाणे प्रतिसाद न मिळाल्यामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १२-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे व त्याचबरोबर त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे नाकारले व जनअपिलीय अधिकारी यांनी देखील त्यांच्या अपीलाची दखल घेतली नाही, हे आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांचे खाते उतारा व इतर तपशील मिळाला आहे. तथापि अपिलार्थीने मागितलेल्या कालावधीतील पंचनाम्याचे वेळापत्रक व त्यानूसार पंचनाम्याचा तपशिल अपिलार्थीस अद्यापही प्राप्त झाला नाही. सदर तपशील १२३ केव्ही सबस्टेशन संगमनेर यांच्याकडे असल्याने व त्यांच्यावर जनमाहिती अधिकारी यांचे नियंत्रण नसल्यामूळे सदर तपशील अपिलार्थीने परस्पर संबंधित सहायक अभियंता यांच्याकडून मागवून घ्यावा, असे अपिलार्थीस जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक- २०-१२-२००६ रोजीच्या पत्रान्वये सुचविले गेले होते.

अपिलार्थीने केलेला मूळ अर्ज दिनांक-१३-१२-२००५ चा होता. त्यामूळे अपिलार्थीस दिनांक १२-०१-२००६ पर्यंत त्यांनी मागितलेली संपूर्ण माहिती जनमाहिती अधिकारी यांनी देणे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ च्या तरतुदी नूसार अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी या प्रमाणे एका वर्षाचा कालावधी ओलांडूनहि काहीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये केलेल्या अर्जाकडे दुर्लक्ष झाल्याचे आज उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. एखादा सामान्य नागरीक शासकीय प्राधिकरणाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार ज्यावेळी माहिती मागतो, त्यावेळी त्याच्या अर्जाची संबंधित प्राधिकरणाकडून कशा प्रकारे दखल घेतली जाते व सामान्य नागरीकांना अपेक्षीत असलेली माहिती मिळण्यापासून त्यांना कसे वंचीत ठेवले जाते याचे, हे प्रकरण म्हणजे एक मुर्तीमंत उदाहरण आहे. आज उपस्थित असलेले जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यास उशिर केवळ त्यांच्या कार्यालयातील समन्वयाच्या अभावामूळे झाला आहे, असे सुनावणीमध्ये सांगत आहेत. हा सर्व प्रकार पाहिला असता, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या अस्तित्वाची दखल जनमाहिती अधिकारी व जनअपिलीय अधिकारी यांनी न घेवून एक प्रकारे माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या विषयी त्यांच्या कृती व्दारे अनादर व्यक्त केला आहे, असे आयोगास वाटते. जरी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे विलंब झाला तरी किमान जनअपिलीय अधिकारी यांनी जे या प्रकरणी एक वरिष्ठ अधिकारी आहेत. त्यांना या कायद्याची आवश्यक ती जाण असणे त्यांचे पद पहाता अपेक्षित आहे. त्यांनी या

प्रकरणी सुनावणी न घेणे, ही बाब देखील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित संगमनेर यांना शोभणारी नाही किंबहूना त्यांच्या या कृतीमूळे आयोग व्यथीत झाला आहे. असे या ठिकाणी म्हणणे जास्त योग्य राहिले.

वास्तविकतः जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे मागितलेल्या माहितीचा विषय त्यांच्याशी संबंधीत नव्हता तर अपिलार्थीच्या अर्जाची प्रत त्यांनी संबंधीत अधिकारी ( ज्यांच्याकडे ही माहिती उपलब्ध आहे) त्यांच्याकडे ५ दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनूसार विहीत केलेल्या कालावधीमध्ये देणे अभिप्रेत आहे. तथापि त्यांनी तशी कोणतीही कृती केल्याचे या प्रकरणी, आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन, दिसून येत नाही. एवढेच नव्हे तरत अपिलार्थीस विहित मदतीत माहिती न देण्याचे कोणतेही कारण आजमितीस त्यांचेकडे नाही. किंबहुना या विलंबास कोणतेही कारण समर्थनीय असू शकत नाही असे आयोगाचे मत आहे. आज उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी या विलंबाचे कोणतेही समर्थनीय कारण आयोगापुढे सांगू शकले नाहीत किंवा आपल्या म्हणण्यास्तव त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. त्यांच्या या औदासिन्याबाबत त्यांना शास्ती लावणे समर्थनीय होऊ शकेल असे आयोगाचे मत आहे.

वरील विवेंचना नंतर आता असे आदेशित करण्यात येते की,-

१) जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ केलेल्या अर्जातील जी माहिती अद्याप देणे राहिले आहे. ती संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्या नंतर पंधरा दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) या प्रकरणी अपिलार्थीने केलेल्या अर्जातील माहिती अपिलाथीस एक वर्ष इतका कालावधी जावूनही अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी लावलेल्या या अक्षम्य विलंबा बाबत संबंधित जनमाहिती अधिकारी यांना २५०/-रुपये प्रतिदिन याप्रमाणे एकुण रुपये २५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी सदर शास्तीची रक्कम हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत खालील शिर्षाखाली जिल्हाकोषागारात जमा करावी.

" ००७० इतर प्रशासनिक सेवा

६० इतर सेवा

८०० इतर जमा रक्कम

१८ माहितीचा अधिकार

००७०-००६-१ "

व तसे केल्याचा अहवाल अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसांचे ओंत आयोगास सादर करावा.

## निर्णय

३. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ केलेल्या अर्जातील जी माहिती अद्याप देणे राहिले आहे. ती संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश प्राप्त झाल्या नंतर पंधरा दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

५. या प्रकरणी अपिलार्थीने केलेल्या अर्जातील माहिती अपिलाथीस एक वर्ष कालावधी जावूनही अपिलार्थीस संपूर्ण माहिती दिली नाही. अपिलार्थीस माहिती देण्यापोटी त्यांनी लावलेल्या या अक्षम्य विलंबा बाबत संबंधित जनमाहिती अधिकारी यांना २५०/-रुपये प्रतिदिन याप्रमाणे एकुण रुपये २५०००/- इतकी शास्ती लावण्यात येत असून त्यांनी सदर शास्तीची रक्कम त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत वर नमूद केलेल्या शिर्षाखाली जिल्हाकोषागारात जमा करावी.

६. वरील आदेश क्रमांक-३ च्या अनुपालनाचा अहवाल अधीक्षक अभिर्येता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, अहमदनगर यांनी हे आदेश निर्गमित झाल्यापासून ४५ दिवसांचे आत आयोगास सादर करावा.

**अहमदनगर.** **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०९-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री. राजेश चंद्रकांत वाकचौरे, रा.१२८, आर्शिवाद स्टेट बँक कॉलनी, मालद रोड, संगमनेर, जिल्हा- अहमदनगर

२ जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उभारणी तथा संचलन व सुव्यवस्था विभाग, संगमनेर,जिल्हा- अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपीलय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, उभारणी तथा संचलन व सुव्यवस्था विभाग, संगमनेर,जिल्हा- अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्यादित, उभारणी तथा संचलन व सुव्यवस्था विभाग, अहमदनगर, जिल्हा- अहमदनगर यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यांत येते.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/३९९/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०९-०७-२००७.

१. सौ.सुनिता बाळासाहेब सानप, .. अपिलार्थी.
साईनगर निवास,
इंजिनिअरिंग कॉलेजरोड लोणी
ता.राहाता, जिल्हा- अहमदनगर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
गटविकास अधिकारी (उ.श्रे.)
पंचायत समिती राहता,
तालूका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

२. जनअपिलीय अधिकारी तथा ..
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर.

**<u>विवेचन</u>**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०९-०७-२००७ रोजी अहमनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी , सौ.सुनिता बाळासाहेब सानप, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी, (उ.श्रे.)पंचायत समिती, राहाता,श्री.जी.आर कदम, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. तर जन अपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर ( येथून पुढे जनअपिलिय अधिकारी असे संबोधण्यात येईल ) हे गैरहजर आहेत.

प्रकरणाच्या सुरुवातीसच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर यांच्यावतीने त्यांच्या कार्यालयातील लिपीक, श्री.ढवळे हे अपिलीय अधिकारी यांची बाजू मांडण्यासाठी त्यांचे प्रतिनिधी म्हणून हजर झाले. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद अहमदनगर हे कार्यालयात हजर असतांना सुध्दा आयोगाच्या सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत. त्यांनी आयोगा विषयी एक प्रकारे अनादर व्यक्त केल्याचे दिसून येते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या या वर्तनाची मुख्य सचिव, महाराष्ट्र यांनी नोंद घेवून त्यांना येथून पुढे आयोगाच्या सुनावणीसाठी व्यक्तीशः हजर राहण्याच्या सूचना आपल्या पातळीवरुन द्याव्यात. असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीने सर्व प्रथम दिनांक- २७-०४-२००६ च्या अर्जान्वये मौजे हसनापूर तालूका- राहाता येथील ग्रामपंचायत टॅक्स अपील क्रमांक- ४२ व ४३ च्या संदर्भात केलेले दिनांक ०७-१२-२००५ च्या टॅक्स अपीला संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१. मौजे हसणापूर ता.राहाता येथील ग्रामपंचायत टॅक्स २००४-०५, २००५-०६ ग्रा.पं. बिल नं. ४२,४३ दि. ७/१२/०५ ने टॅक्स अपिल दाखल केलेले आहे. त्यावर केलेली कार्यवाहीच्या संपूर्ण नकला. कार्यवाही प्रलंबीत झाल्याचे कारण.

२. ग्रामसेवीका हसणापूर यांनी टॅक्स अपिल मध्ये जाणुनबुजून माहिती न दिल्यामुळे हुकमाची अवमान्यता झाल्याबद्दल त्यांच्यावर केलेली कार्यवाहीचा तपशिल. / हुकमाची अवमान्यता झाली असूनही त्यांच्यावर कार्यवाही झाली नसल्यास त्यांना पाठीशी घालण्याचे कारण याचा संपूर्ण लेखी खुलासा."

सदर माहिती अपिलार्थीने टपाला व्दारे अपेक्षिली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक २९-०५-२००६ चे पत्रान्वये सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने आपणास माहिती देता येणार नाही, असे कळविले व त्याच बरोबर न्यायालयाच्या निर्णया नंतर अपिलार्थीस माहिती पुरविण्याची कार्यवाही केली जाईल. असे अपिलार्थीस आश्वासीत केले.

अपिलार्थीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या वरीलप्रमाणे उत्तराने समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने दिनांक ३१-०५-२००६ रोजी जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले आहे. अपिलार्थी यांच्या या अपील अर्जावर जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे कोणतीही सुनावणी झाली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. त्याचबरोबर आयोगास उपलब्ध करुन देण्यात

आलेल्या कागदपत्रामध्ये जनअपिलीय अधिकारी यांनी या अपीलअर्जाची सुनावणी घेतल्या संदर्भात कोणताही पुरावा कागदोपत्री जनमाहिती अधिकारी यांच्या नस्तीत देखिल उपलब्ध नाही.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादामूळे व्यथीत होवून अपिलार्थीने दिनांक- २५-०७-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) नुसार व्दितीय अपील दाखल केले आहे.

या अपीलामध्ये अपिलार्थीने आपली मुळमाहितीची मागणी कायम ठेवली आहे व या व्दितीय अपीलाचे कारण म्हणून अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नाही, असे कारण दर्शविले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभूमी समजावून घेतली असता, असे आढळून आले आहे की, अपिलार्थी हे मौजे हसणापूर येथील रहिवाशी असून तेथे त्यांच्या मालकीची क्रमांक १८३/४४० व क्रमांक १८४ अशी दोन घरे आहेत. अपिलार्थी यांच्या दोन्हीही मालमत्तेवर प्रति वर्ष ४५८३/- रुपये इतका कर लावला जात होता. तथापि दिनांक- १९-०३-२००५ रोजी ग्रामपंचायत हसणापूर यांनी ठराव करुन तो २५,१८३/- रुपये प्रति वर्ष इतका वाढवला घरपट्टीवर झालेल्या अशा प्रकारच्या वाढीमूळे अपिलार्थीने व्यथीत होवून संबंधित गटविकास अधिकारी यांच्याकडे या निर्णया विरुध्द अपील केले होते. तथापि गटविकास अधिकारी यांनी या प्रकरणी कोणताही निर्णय दिला नाही, असे अपीलार्थी यांचे म्हणणे आहे. तर अपिलार्थी यांनी ज्या दिवशी गटविकास अधिकारी यांच्याकडे अपील केले

त्याच दिवशी त्यांनी राहाता येथील  न्यायालयात ४५६/०४ या क्रमांकाचा दावा दाखल केला आहे.  अपिलार्थीने न्यायालयात दावा दाखल केला असल्यामूळे त्यांना टॅक्स अपीलावर निर्णय घेता आला नाही, असे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांचे म्हणणे आहे.

प्रकरण या टप्यावर आले असतांनाच अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ३१-०५-२००६ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपील केले आहे. या अपिलावर कोणत्याही प्रकारची सुनावणी झाली नाही. त्यामुळे व्यथीत होवून अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २५-०७-२००६ रोजी व्दितीय अपिल केले आहे.

या प्रकरणात अपिलार्थीने प्रथम अपिलावरील सुनावणीच्या निर्णयाची वाट न पाहता आयोगाकडे सरळ व्दितीय अपिल केले आहे. अपिलार्थीचा माहितीचा विषय व स्वरुप पाहता या प्रकरणी  प्रथम सुनावणी होणे हे अपिलार्थीस न्याय मिळण्याचे दृष्टीने, आवश्यक व अधिक गरजेचे आहे असे आयोगाचे मत आहे. त्यामुळे असे आदेशित करण्यात येते की, जनअपिलीय अधिकारी यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून, या प्रथम अपिलाची सुनावणी घेवून या अपीलावर त्यांनी तीन आठवडयाचे आत आदेश निर्गमीत करावेत. जर अपिलार्थीस जनअपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय मान्य नसेल तर अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील. वरील विवेंचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. जनअपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक- २१-०५-२००६ च्या या प्रकरणातील अपीलावर हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन आठवडयाच्या आत या अपीलाची सुनावणी घेवून निर्णय द्यावा व आपला अनुपालन अहवाल  तद्नंतर

सात दिवसाच्या आत सादर करावा. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

७. अपील निकाली काढण्यात येत आहे.

८. हे आदेश निर्गमीत झाल्यापासून अपिलार्थीने केलेल्या दिनांक- ३१-०५-२००६ च्या प्रथम अपिलाची सुनावणी घेवून या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी तीन आठवडयाचे आत त्यांचेकडील आदेश निर्गमीत करावे.

**अहमदनगर.**
दिनांक ०९-०७-२००७

**(वि. बा. बोरगे)**
**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ सौ.सुनिता बाळासाहेब सानप, मु.पो.साईसागर निवास, इंजिनिअरींग कॉलेज रोड, लोणी, तालूका-राहाता, जिल्हा- अहदमनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा गटविकास अधिकारी (उ.श्रे.)पंचायत समिती राहाता, जिल्हा- अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपीलय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, अहमदनगर,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ मुख्य सचिव, महाराष्ट्र-राज्य मंत्रालय, मुंबई यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात येते.

५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक- २००७/४००/रामाआ/औ'बाद
निर्णय दिनांक ०९-०७-२००७.

१. श्री.किशोर भानुदास पवार, .. अपिलार्थी.
मु.पिंप्रीवळण, पो.खेडले परमानंद,
तालूका- राहूरी, जिल्हा- अहमदनगर.

विरुध्द

१. जनमाहिती अधिकारी तथा .. प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
मुळा पाटबंधारे विभाग,
अहमदनगर.

२. जनअपिलिय अधिकारी तथा ..
अधिक्षक अभियंता व प्रशासक
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,
सिंचन भवन, त्र्यंबकरोड, नाशिक.

## विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०९-०७-२००७ रोजी अहमनगर येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी श्री.किशोर भानुदास पवार, (येथून पुढे अपिलार्थी असे संबोधण्यात येईल.) व जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर, श्री. एन.एम.तपासे, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे हजर आहेत. जनअपिलीय

अधिकारी तथा अधिक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, त्र्यंबकरोड, नाशिक, ( येथून पुढे जनअपिलीय अधिकारी असे संबोधण्यात येईल.) हे गैरहजर आहेत. त्यांचे वतीने श्री.के.एम.शेख, सहाय्यक अधिक्षक अभियंता व प्रशासक हे हजर आहेत.

या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे कडील दिनांक- १२-०६-२००६ रोजीच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील मुद्यावर माहिती मागविली होती.

"१) मुळा उजव्या कालव्यावरील वितरीका नंबर ३ वरील विमोचक नंबर अनुक्रमे डावे ७, डावे ८, डावे, ९ व डावे १० या चार विमोचकांच्या मुळ शासकीय नकाशाची प्रमाणीत प्रत मिळावी, त्या नकाशामध्ये खालील बाबी स्पष्टपणे दर्शविलेल्या असाव्यात.

अ) विमोचक

ब) प्रत्येक विमोचकाच्या लाभक्षेत्राची हद्द गडद सिमारेषेने दर्शविणे.

क) विमोचकांचे लाभक्षेत्र हे विमोचकानुसार वेगवेगळया रंगांने दर्शविणे.

ड) प्रत्येक विमोचकाच्या लाभक्षेत्रांतर्गत असलेली सिंचन प्रणाली स्पष्टपणे दर्शवावी.

इ) प्रत्येक विमोचकाच्या लाभक्षेत्रात विमोचकाच्या मुखापासून तर संपूर्ण लाभक्षेत्रात प्रत्येक गटनंबरपर्यंत पाणीवितरण करणारी चारी स्पष्टपणे दर्शवावी.

ई) अपिलीय प्राधिका-याचे नांव, हुद्दा, फोन नंबर, ई-मेल व पत्रव्यवहारासाठी कार्यालयीन पत्ता मिळावा.

सदर माहिती अपिलार्थीने सन २००१ पासून ते अर्ज केलेल्या दिनांकापर्यंत म्हणजेच १२-०६-२००६ पर्यंत रजिष्टर पोष्टाने मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम दिनांक- ०३-०७-२००६ रोजी माहिती देण्यापोटी लागणारे शुल्क रुपये ६०/- कार्यालयात भरण्याचे सूचीत केले व त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक- १०-०७-२००६ रोजी आवश्यक त्या शुल्काचा भरणा जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात केल्यानंतर अपिलार्थीस आवश्यक ती माहिती दिनांक- १५-०७-२००६ रोजी पुरविण्यात आली.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून आलेल्या वरीलप्रकारच्या माहितीवर अपिलार्थीचे समाधान न झाल्यामूळे अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २८-०७-२००६ रोजी प्रथम-अर्जाव्दारे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील केले आहे. यामध्ये अपिलार्थी यांनी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना संदर्भीय माहिती प्रमाणीत प्रतीमध्ये माहिती दिली नाही व जाणुनबुजून चुकीची व दिशाभूल करणारी अशी माहिती दिलेली आहे. तर काही माहिती दुष्ट हेतूने लपवून ठेवली आहे. त्याचबरोबर अपिलार्थीने करारनामा व संयुक्त पहाणी अहवाल यांच्या सर्टीफाईड प्रती ज्या अपील अर्जामध्ये मागीतल्या आहे व मूळ शासकीय नकाशाची प्रत जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून मागितली आहे. अपिलार्थीने जनअपिलीय अधिकारी यांचेकडे केलेल्या अपिल अर्जाची पाहणी करता असे दिसून येते की, अपिलार्थीने जनमाहिती अधिकारी यांच्याकडे केलेल्या मूळअर्जापेक्षा जास्त व वेगळी माहिती या अपीलअर्जामध्ये केली आहे. ही जास्त व वेगळी माहितीची मागणी आजच्या सुनावणीमध्ये विचारात घेण्यात येत नाही.

या अपीलावर जनअपिलीय अधिकारी यांनी दिनांक- ०७-०९-२००६ रोजी सुनावणी घेवून दिनांक- २१-०९-२००६ रोजी आपला निर्णय पारीत केला. त्यामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना अर्जदारास त्यांचे मागणीप्रमाणे सर्टीफाईड प्रतीत सदर माहिती पुनश्चः उपलब्ध करुन देण्याचे सूचीत केले.

जनअपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त होवून देखील अपिलार्थीस सर्टीफाईड प्रती प्राप्त न झाल्यामूळे त्यांनी व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २४ एप्रिल, २००७ रोजी व्दितीय अपील केले आहे.

या ठिकाणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे कालबाहय (Timerbar) झालेले आहे. तथापि अपिलार्थीस अपूरी माहिती मिळाल्याचे राज्य माहिती आयोगाची खात्री पटल्यावरुन माहिती अधिकार अधिनियमा मधील कलम १९ (३) मधील तरतुदी प्रमाणे अपिलार्थीचे हे अपील राज्य माहिती आयोग विचारात घेत आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांच्या तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, त्यांनी अपिलार्थीस ही माहिती दिनांक- १५-०७-२००६ रोजी पुरविली आहे.

जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीची पहाणी करता, असे दिसून येत आहे की, अपिलार्थीस पाठविण्यात आलेल्या नकाशामध्ये अपिलार्थीच्या माहितीतील मुद्दा क्रमांक-१, अ,ब,क, व ई चा समावेश आहे. अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १- ड,ब, १-इ या संदर्भात माहिती या नकाशामध्ये देण्यात आलेली नाही. सदर माहिती का देण्यात आली असे उपस्थित जनमाहिती अधिकारी यांना विचारले असता, अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा ड - सिंचन प्रणाली म्हणजे नक्की काय हे समजले नाही. असे त्यांनी सांगितले. या

संदर्भात त्यांनी दिनांक- १५-०६-२००६ रोजी एक पत्र पाठवून अपिलार्थीस तसे कळविले आहे. त्याचबरोबर अपिलार्थीच्या १-इ या मुद्याच्या संदर्भात प्रत्येक गट नंबर पर्यंत पाणी, स्वतः शेतक-यांना शेतचारी करुन घ्यावयाची, असल्यामूळे विमोचन करणारे शेतचारे त्यांना दाखविणे शक्य नाही व फक्त विमोचक हेड ते पुच्छ भागा पर्यंत हाच भाग नकाशामध्ये दाखविला असल्याचे त्यांनी अपिलार्थीच्या या पत्राव्दारे कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांचे पुढे म्हणणे असे आहे की, या शेतातील चारे या नकाशात दाखविता येणार नाहीत. कारण या संदर्भातील कोणतीही कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत. त्यांच्याकडे फक्त विमोचक व त्या विमोचकाच्या प्रभावाखालील लाभक्षेत्र एवढाच नकाशा उपलब्ध आहे व त्यांनी तो अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेला आहे. विमोचका पासून जी चारी काढली जाते त्या संदर्भातील माहिती संबंधीत लाभक्षेत्राच्या पाणीवापर संस्थेच्या कार्यालयात असणे अभिप्रेत आहे. तथापि अपिलार्थी यांचे म्हणणे असे आहे की, हया चारी करिता जलसंपदा विभागाने भुसंपादन केले असून संबंधित शेतक-यांना त्यांचा मोबदला देखिल दिला आहे. त्याचबरोबर जलसंपदा विभागाचे अधिकारी शासकीय खर्चाने या जागा दुरुस्त करत असून त्यामूळे ही माहिती, जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असलीच पाहिजे.

अपिलार्थीने संबंधीत नकाशा प्रमाणीत करुन मागितला होता. त्याप्रमाणे आज रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे संबंधीत नकाशा उपलब्ध आहे. दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थी यांनी मागितलेल्या चारीचा नकाशा व जलसंपदा विभागाने सदर नकाशाची दर्शविलेली अनुउपलब्धता या दोन्हीही बाबींचा परामर्श मुख्यअभियंता, जलसंपदा, उत्तर महाराष्ट्र प्रादेशिक विभाग नाशिक यांनी आवश्यक वाटल्यास मृदसंधारण विभागाच्या अधिका-याच्या

सहकार्याने घ्यावा व अपिलार्थीस हे आदेश निर्गमीत झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत त्यांनी प्रथम अर्जाव्दारे मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी.

त्याचबरोबर अपिलार्थीस, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या नकाशाची प्रमाणीत प्रत हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी, असेही पुढे आदेशीत करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

९. अपील निकाली काढण्यात येत आहे.

१०. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या नकाशाची प्रमाणीत प्रत हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीन दिवसाच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अहमदनगर.** **(वि. बा. बोरगे)**
दिनांक ०९-०७-२००७ **राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद**

प्रति,

१ श्री.किशोर भानुदास पवार, मु.पिंप्रीवळण, पो.खेडलेपदमानंद, व्हाया- सोनई, तालूका-राहुरी, जिल्हा- अहमदनगर.

२ जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३ जनअपीलय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, त्र्यंबक रोड, नाशिक ,यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई – ३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२८१

निर्णय दिनांक १३-०७-२००७

| | | |
|---|---|---|
| श्री. शेषराव लिंबाजी कदम,<br>व्दारा भारतीय विद्यामंदिर, पोस्ट ऑफिस रोड,<br>हिंगोली तालुका जिल्हा हिंगोली | : | अपीलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा<br>परिषद, हिंगोली जिल्हा हिंगोली | : | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, हिंगोली जिल्हा हिंगोली | : | प्रतिवादी |

**विवेचन**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. शेषराव लिंबाजी कदम, हिंगोली (येथून पुढे त्यांना अपिलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, हिंगोली जिल्हा हिंगोली यांचे वतीने त्यांचे प्रतिनिधी श्री. महमद जबारोद्दीन हे

हजर आहेत. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली जिल्हा हिंगोली हे अनुपस्थित आहेत.

सुरुवातीसच अपीलार्थी यांना त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील पुढे चालवावयाची आवश्यकता नसल्याने ते परत घेत असल्याचे दिनांक १०-०७-२००७ चे पत्र राज्य माहिती आयोगास सादर केले आहे. अपीलार्थीने आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता अपिलार्थी स्वतः मागे घेत असल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील आता खारीज करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक १३ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेषराव लिंबाजी कदम, व्दारा भारतीय विद्यामंदिर, पोस्ट ऑफिस रोड, हिंगोली तालुका जिल्हा हिंगोली

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, हिंगोली जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली जिल्हा हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/३७४

निर्णय दिनांक १३-०७-२००७

श्री. सुरेश बलभिमराव पालवे, : अपीलार्थी
मु. पो. पांगरी तालुका पाटोदा
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी :
तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय),
विशेष शाखा १ गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा १
गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३-०७-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळेस अपीलार्थी श्री. सुरेश बलभिमराव पालवे (यापुढे त्यांना अपीलार्थी असे संबोधण्यात येईल) व जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय), विशेष शाखा १ गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई श्री. प्रकाश कथू भोई (यापुढे त्यांना जन माहिती अधिकारी असे संबोधण्यात येईल) हे हजर आहेत. जन अपिलीय

अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा १ गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई हे सुनावणीस गैरहजर आहेत याची आयोगाने सखेद नोंद घेतली आहे.

या प्रकरणी अपीलार्थीने सर्व प्रथम त्यांच्या कडील दिनांक १०-०२-२००६ रोजीच्या अर्जान्वये खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

> " माझी पत्नी अनिता हिने आपल्या कार्यालयास दिनांक १७-०७-२००४, ०९-०८-२००४, ०६-०९-२००४, व २४-०१-२००५ रोजी केलेल्या तक्रारी आपणास प्राप्त आहेत. तसे आपण दिनांक ३०-१२-२००५ रोजीच्या पत्राने मला कळविले आहे. आपण या सर्व तक्रारीवर काय कार्यवाही केली या सर्व कार्यवाहीच्या कागदपत्रांच्या प्रती मला पाहिजे आहेत. "

अपीलार्थीने या अर्जामध्ये संबंधित असलेल्या माहितीचा कालावधी संदर्भात "वरील तारखाप्रमाणे" असा उल्लेख केला आहे व ही माहिती त्यांनी नोंदणीकृत टपालाव्दारे मागविली आहे.

अपीलार्थीच्या या प्रथम अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २२-०२-२००६ रोजी प्रथम प्रतिसाद दिला त्यामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २४ उप कलम ४ अन्वये शासनाने दिनांक २४ ऑक्टोंबर २००५ रोजीच्या अधिसूचनेप्रमाणे पोलीस खात्याचा " विशेष शाखा " विभाग या माहिती अधिकार अधिनियम २००५ मधून वगळला गेल्या असल्यामुळे अपीलार्थीच्या मागणीची पुर्तता करता येणार नसल्याचे अपीलार्थीस कळविले आहे.

तथापि या उत्तरावर समाधान न झाल्याने अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अन्वये दिनांक १५-०३-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. जन अपीलीय अधिकारी यांनी या अपीलावर कोणत्याही

प्रकारची सुनावणी न घेता अपीलार्थी यांचे अपील त्यांचे दिनांक ०७-०४-२००६ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराशी सहमती दर्शवून आपला अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपीलार्थीस कळविले.

जन अपीलीय अधिकारी यांच्याकडून कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद न झाल्याने व्यथित होऊन अपीलार्थीने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) मधील तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये अपीलार्थी यांनी आपली माहितीची मूळ मागणी कायम ठेऊन जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आज रोजी झालेल्या युक्तीवादामध्ये या प्रकरणाची पार्श्वभुमी समजावून घेतली असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलार्थी यांचे, त्यांचे काका श्री. पंढरीनाथ विनायक पालवे यांच्याशी शेतीच्या वाटपासंबंधात वैयक्तीक भांडण असून हे प्रकरण दिवाणी न्यायालयात प्रलंबीत आहे. त्याचबरोबर अपीलार्थी व त्यांचे चुलते यांनी पाटोदा पोलीस ठाण्यामध्ये एकमेकांच्या विरुध्द तक्रारी दाखल केल्या आहेत. अपीलार्थी यांनी प्रथम अर्ज दिनांक १०-०२-२००६ रोजी सहायक पोलीस आयुक्त विशेष शाखा नवी मुंबई यांच्याकडे माहितीकरिता दाखल केला होता तथापि दिनांक २४ ऑक्टोंबर २००५ पासून शासनाच्या गृह विभागाच्या “विशेष शाखा” या विभागास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधून २४ ऑक्टोंबर २००५ पासून वगळले असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे अपीलार्थीस त्यांनी माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि अपीलार्थीने अर्ज केला त्यावेळी जन माहिती अधिकारी हे पद या यंत्रणेमध्ये आस्तित्वात होते असे त्यांनी सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाशी आयोग सहमत आहे. सहायक पोलीस आयुक्त विशेष शाखा यांना ज्या आदेशान्वये जन माहिती अधिकारी म्हणून संबंधित प्राधिकरणाने नेमले आहे, ते आदेश, हा कायदाच आता विशेष शाखा या यंत्रणेला लागू नसल्यामुळे, निष्प्रभ ठरतात

तथापि या कायद्यांर्तगत सुरुवातीस ज्या आदेशाव्दारे जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांची नेमणूक केली गेली होती ते आदेश रद्द झाल्याचे परिपत्रक आता संबंधित प्राधिकरणाने जारी करावे अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे. त्याच बरोबर अपीलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या माहिती संदर्भात अपीलार्थीस विशेष शाखेमार्फत मार्गदर्शनपर पत्र त्यांनी १० दिवसाचे आत पाठवावे जेणेकरुन अपीलार्थीस पुढील आवश्यक ती कारवाई करण्यास मदत होईल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभुमीवर अपीलार्थीचे अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक १३ जुलै २००७ राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुरेश बलभिमराव पालवे, मु. पो. पांगरी तालुका पाटोदा जिल्हा बीड
२ जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (मुख्यालय), विशेष शाखा १ गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
३ जन अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा १ गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
४ सचिव गृह विभाग मंत्रालय मुंबई – ४०० ०३२ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.
५ सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.
६ निर्णय नस्ती